म. ग्रं. सं. ठाणें

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

सन

पुस्तकाचें नांव सनातन वैदिक धर्माशिक्षा

म. ग्रं. सं. ठाणें
विषय धर्म
सं. क्र. ८०

२९

धर्म

॥ श्री ॥

# सनातन वैदिक धर्मशिक्षा.

कोणी महान् सिद्ध पुरुषांकडून मिळालेली

पूर्वीं फुटकळ छापून प्रसिद्ध झाली ती
हल्लीं पुस्तक रूपानें एकत्र करून


शंकर विश्वनाथ केळकर
यानीं
आपल्या पुर्णवैभव छापखान्यांत छापून
प्रसिद्ध केली.

शके १८०४
इसवी १८८३



या ग्रंथाचे सर्व हक्क १८६७ च्या २५ अकटाप्रमाणें प्रकाशकांनीं आपणाकडे ठेविले असत.


किंमत साहा आणे

ठाणे

# प्रस्तावना.

ह्या लहानशा पुस्तकाचें नांव " सनातन वैदिक धर्मशिक्षा " असें आहे, ह्मणजे शाश्वत जो वेदोक्तधर्म व तत्संबंधी शिकवण, असा हिचा अर्थ आहे.

या पुस्तकाचे भाग तीन असून पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या भागांत मिळून क्रमानेंच तीन, पांच, व तीन, अशी एकंदर अक्रा प्रकरणें आहेत. या मध्यें पहिला पारमार्थिक भाग, दुसरा प्रापंचिक भाग, आणि तिसरा सार्वजनिक भाग, येणेंप्रमाणें व्यवस्था आहे.

या आर्य प्रदेशांत स्मार्त आणि भागवत असे मुख्यत्वेंकरून दोन प्रकारचे लोक आहेत. त्यांत स्मार्त ह्मणजे, वेदश्रुतीस अनुसरून चालणाऱ्या ज्या मुख्य मन्वादिकांच्या स्मृति तदनुसार चालणारे लोक, आणि भागवत ह्मणजे भागवत पुराणाधारें चालणारे लोक, या दोहों करितांच प्राधान्यानें ही शिक्षा आहे; कारण, हे उभयतां ही श्रीमच्छंकराचार्यांसच मानणारे आहेत.

या पुस्तकांत जें शिक्षण लोकांस देण्याचें योजिलें आहे, तें, राजे, संस्थानीं, जहागीरदार यांच्या द्वारें योजिलें आहे; कारण, आज ते जसे यांतील सार्वजनिक वगैरे गोष्टी त्वरित अमलांत आणण्यास समर्थ आहेत, तसे इतर लोक नाहींत; ह्मणून वैदिक धर्मी राजादिकांनीं प्रथम हें वळण दाखवावें आणि नंतर त्या प्रमाणें इतरांनीं चालावें असा याचा उद्देश आहे. इतक्यावर इतरत्र हें वळण कोणी घेऊन चालतील तर चांगलेंच झालें.

ही शिक्षा कोणी रचिली व आमच्या हातीं कशी आली वगैरे विषयीं इतकेंच येथें सांगणें पुरे आहे कीं, ही कोणी श्रीमत्परमहंस सिद्ध पुरुषांची रचित असून त्यांचे पट्टशिष्य " श्रीमत्सकलबुधवरद " नामक सत्पुरुषांचे संग्रहास होती, ती आह्मास आमच्या एका परम अंतरंग मित्राच्या द्वारें पाहण्यास सांपडल्यावरून, आह्मी त्याच्या परवानगीनें छापून प्रसिद्ध केली.

"विचारमाला " ही ही आह्मास इकडूनच मिळाली, व ती आह्मी आधीं छापणार ही होतों. परतु शिक्षेचाच प्रस्तुतकाळीं उपयोग प्रथम होणें इष्ट वाटल्यावरून आधीं "शिक्षाच"हातीं घेतली, व त्यामुळें " माला " अवधीवर पडली. याबद्दल आम्ही आमच्या आश्रयदात्यांची क्षमा मागून त्यांस वचन देतों कीं तीही त्यांस आम्ही लवकरच मिळेल असें करूं.

पुणें ता० १० फेब्रुवारी सन १८८३. { शंकर विश्वनाथ केळकर, पुणेंवैभवाचे मालक

# सनातन वैदिक धर्मशिक्षा.

[पारमार्थिक भाग]

## प्रकरण पहिलें.

### वैदिक धर्माची व्याख्या व व्यवस्था.

ह्या त्रिभुवनात्मक ब्रम्हांडांत, यच्चयावत् जेवढे म्हणून प्राणी आहेत; तेवढे सर्व, एक आदिगुरु जो परमेश्वर त्याचेच अनुगृहीत आहेत; मग ते पूर्वी होऊन गेलेले, प्रस्तुत असलेले, व पुढें होणारे, केव्हांचेही असोत.

परमेश्वरानें केलेला अनुग्रह प्राणीमात्रांच्या ऐहिक जीवनास जसा हेतु आहे, तसाच तो पारलौकीक जीवनासही आहे. तो असा कीं, स्वकीय जी अक्षयानंदरूपता ती गेलीशी वाटून, प्राण्यास नसतें मर्त्यत्व किंवा जीवत्व येण्यास कारणीभूत जें अज्ञान, तद्रूप अंधकाराचा नाशक असा प्रखर तेजस्वी ज्ञानदीपही आहे. हा दीप, तीव्र तर अधिकारावांचून ज्याचा त्यास स्वतःच कळणें कठीण आहे म्हणून, त्या वांचून इतरांस सद्गुरूची अपेक्षा आहे. अस्तु, या परमेश्वरानुग्रहाचा प्राणीमात्रांच्या ठायीं अहोरात्र इतका सतत घोष चालला आहे कीं, तो त्याच प्रभूच्या प्रेरणेनें चालला असल्यामुळें त्यास खंड म्हणून अगदींच नाहीं. यास प्रमाण हें वचन आहे तें पहा.

> गमागमस्थं गमानादिशून्यं चिद्रूपदिपं तिमिरांधहारं ।
> पश्यामि ते सर्व जनांतरस्थं नमामि हंसं परमात्म रूपं ।
>
> (अजपाप्रकरण.)

हा अनुग्रह प्रणवा सहित सर्व वेदाचें मूळ आहे, हे तत्त्ववेत्ते जे महर्षि त्यांस त्या परमेश्वराच्याच प्रसादानें श्रुत झालेलें आहे; म्हणून श्रुतिप्रतिपाद्य जो धर्म, तोच सर्व प्राण्यांस परमेश्वरदत्त

असल्यामुळें अगत्य पालनीय आहे. तात्पर्य वेदप्रतिपाद्य धर्म सर्वत्रांस एकच आहे, व यास जो जाणेल तोच साधुही आहे.

संपूर्ण धर्मीमाजी धर्म । स्वरूपीं राहणें स्वधर्म ।
हेंचि जाणिजे मुख्य धर्म । साधु लक्षणाचें ॥
सकळजीवां एक पृथिवी । सकळ जीवां एक रवि ।
सकळजीवां वर्तवी । एक वायु ॥
सकळजीवां एक पैस । जयास बोलिजे आकाश ।
तैसा सकळ जीवांचा वास । एका परब्रह्मीं ॥ (दासबोध.)

मानवी जीवांच्या अधिकार भेदानें कर्मकांड, उपासनाकांड आणि ज्ञानकांड, अशी वेदांची त्रिकांडरूपानें व्यवस्था आहे. त्यांत ज्याचें चित्त शुद्ध नाहीं त्यानें, चित्तशुद्धीसाठीं आपल्या वर्णाश्रमानुरूप वेदोक्त कर्म परमेश्वरार्पण बुद्धीनें ह्मणजे फलाशा रहित करावें. म्हणून असा पुरुष कर्मकांडाचा अधिकारी होय. ज्याचें चित्त शुद्ध आहे परंतु स्थिर नाहीं, त्यानें त्याच्या स्थैर्यासाठीं वर प्रमाणेंच वेदोक्त उपासना करावी. म्हणून असा पुरुष उपासना कांडाचा अधिकारी होय. आणि ह्या दोन गोष्टी ज्यास अनुकूल आहेत, ह्मणजे ज्याचें चित्त शुद्ध व स्थिर आहे त्यानें, ज्ञानकांडावर आरूढ होण्यासाठीं सद्गुरुचा आश्रय करावा, म्हणून असा पुरुष ज्ञानकांडाचा अधिकारी होय. तात्पर्य, कर्म हें वेदाचा पूर्व भाग, उपासना मध्य भाग आणि ज्ञान अंत्य भाग आहे म्हणून, ज्ञानकांडास मात्र वेदांत असें नांव आहे.

कर्म, उपासना आणि ज्ञान, अशा तात्पर्यपर वेदामध्यें ज्या तीन प्रकारच्या श्रुति आहेत त्यांचे द्रष्टे जरी अनेक ऋषि होत, तरी सर्वांस दृष्ट झालेल्या मंत्रांची यथायोग्य व्यवस्था करून, त्यांचा विस्तार करणें हा अधिकार व्यास ऋषींस आहे. हे व्यास प्रतिपर्ययांत निरनिराळे होत असतात, व त्यांस त्यांस तो तो अधिकार परमेश्वराज्ञेनेंच प्राप्त झालेला असतो. पर्यय ह्मणजे कृत, त्रेता, द्वापर आणि कलि, एतद्रूप महायुग अथवा चौकडी सम-

जावी. अस्तु, सांप्रत जो व्यास आहे, त्याचें नांव कृष्णद्वैपायन किंवा बादरायण आहे असें समजावें.

व्यासस्थापित जी वैदिकधर्ममर्यादा, तिचें उल्लंघन पशुपक्ष्यादिक अज्ञान प्राणी शिवाय करून मानवी प्राण्यांकडून कधींच होऊं नये. कारण आहर, निद्रा, भय आणि मैथुन, हीं संपादन करण्याच्या ज्ञानाहून मनुष्य प्राण्याच्या ठायीं सदसद्विचारशक्ति ही एक विलक्षण अधिक आहे. असें असतां जे मनुष्य तिचा योग्य व्यय करीत नाहींत, व पूर्वोक्त धर्ममर्यादेचें उल्लंघन करून स्वैरपणानें चालतात, त्यांस नास्तिक किंवा पाखंडी म्हणतात. असे नास्तिक, प्रस्तुत चाललेल्या श्वेतवाराह कल्पाच्या आरंभा पासून आजपर्यंत मुख्य आठ होऊन गेलेले आहेत. त्यांचीं क्रमानेंच नांवें—अर्हत राजा, वेनवसुमति राजा,-विरोचन दैत्य राजा, चार्वाक, क्षपणक, बुद्ध अथवा बौद्ध, आणि दुसरा अर्हत अशीं आहेत.

या नास्तिकां पैकीं चार्वादिक अर्वाचिन नास्तिकांनीं, सांप्रतच्या व्यास ऋषींची स्थापित जी वैदिकधर्ममर्यादा ती उच्छिन्न करून नैमिषारण्यांतील त्यांची गादी मोडिली असतां, ती गोष्ट आदिगुरु परमेश्वरास सहन न होऊन, तो शंकराचार्य[१] अशा नांवानें भूमीवर अवतरला व त्यानें आस्तिक व नास्तिक तटस्थांस पराभूत करून व्यासांची गादी पुनः स्थापिली. तेच प्रस्तुत असलेले चार दिशांकडील चार[२] मठ होत.

---

१ शंकराचार्यांस होऊन गेल्याला आज २८२५ वर्षें झालीं आहेत; कारण त्यांचें जन्म युधिष्ठिर शक २१५८ त झालें होतें.

२ च्यार मठांची स्थापना शंकराचार्यांनीं जी केली, ती ते जगद्गुरु असतां इतकी कोती कां केली ? त्यास असें समजावें कीं, यवनादिक हे वेदबाह्य धर्म पाळीत असल्यामुळें त्यांचा प्रदेश त्यांनीं वगळला, तथापि त्यांच्या जगद्गुरुत्वास बाध नाहीं; कारण परमेश्वरानुग्रहाचा सतत चाललेला घोष अमुक मानव प्राण्यांमध्यें नाहीं, असा मनुष्यच पृथ्वीवर नाहीं. सारांश, सर्वांवर गुरुत्व वेदव्यासांचें अथवा त्यांचे अभिषिक्त शंकराचार्यांचेंच निःसंशय होय.

शंकराचार्यांनीं येथें येऊन, अगदीं अल्पकाळांत ज्या अद्भुत गोष्टी करून यथापूर्व धर्मस्थापना केली ती पाहून व त्यांस स्वतःसिद्ध जगद्गुरुत्व असतां त्यानीं शिष्टाचार परिपालनार्थ गोविंदयतीस गुरुत्वानें मानून स्वतःस आपल्या प्रशिष्याचें प्रशिष्य ह्मणविलें तेंही श्रवण करून, मोठ्या सुप्रसन्न मनानें व्यासानीं त्यांस समक्ष दर्शन दिलें, आणि स्वमुखानें जगद्गुरु असें म्हणून त्या पदवीचा भागीरथी जलानें अभिषेकही केला.

आचार्यांनीं जे चार मठ किंवा गाद्या चार दिशांस स्थापिल्या त्यांचीं नांवें अशीं आहेतः—पहिला शारदा मठ पश्चिम समुद्रतीरीं द्वारकेजवळ आहे, दुसरा गोवर्धन मठ पूर्व समुद्रीं जगन्नाथाजवळ आहे, तिसरा जोशी मठ हा हिमालयावर बदरीकेदाराजवळ आहे, आणि चौथा शृंगेरी मठ रामेश्वराकडे तुंगभद्रेच्या तीरीं आहे.

याप्रमाणें मठस्थापना झाल्यावर, आश्रम भेदानें आचार्यांनीं कपिलदत्तादि स्थापित प्राचीन संप्रदाय उच्छिन्न झालेले पुनः स्थापून चालू केले, त्यांचीं नांवें:—( तीर्थ व आश्रम ) ( वन आणि अरण्य ) ( गिरि, पर्वत व सागर ) आणि ( सरस्वती[१], भारती व पुरी ) हे संप्रदाय वर दाखविलेल्या मठ क्रमानें संन्यासी यानीं मात्र पाळायाचे. त्याचप्रमाणें स्वरूप, चैतन्य, आनंद आणि प्रकाश हे संप्रदाय ब्रम्हचर्यादिक तीन आश्रमस्थानींच पाळायाचे होत.

वर सांगितलेले संप्रदाय, मठक्रमानुरूप ते ते आश्रमस्थ आपापल्या नांवांपुढें उपपदा प्रमाणें कसे जोडतात, त्या विषयीं हीं नांवें पहा. जसें भारती तीर्थ, विद्यारण्य, आनंदगिरी, नृसिंहसरस्वती, त्रिविक्रम भारती, इत्यादि संन्यासी असून, ते कोणत्या मठाकडचे कोणते, तें यावरून ओळखूं येतें. त्याच-

---

१ सरस्वती संन्यास्यांत इंद्रसरस्वती व आनंद सरस्वती असे दोन भेद आहेत.

प्रमाणें रामस्वरूप, केशवचैतन्य, निजानंद व स्वयंप्रकाश, इत्यादि ब्रम्हचारी आदिकरून मठक्रमानुरूप असल्याचेंही अगदीं उघड समजून येतें. आलीकडे आलीकडे जे कित्येक मुकुंदराज, ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास, रंगनाथ, तुकाराम, आदिकरून भगवद्भक्त होऊन गेले, त्यांनीं मात्र हीं उपपदें आपापल्या नांवा-पुढें जोडण्याचें सोडून दिलेंसें दिसून येतें. अस्तु; मुख्य मठां-नून तेथील तेथील संन्यासी अधिकारी, जरी मठक्रमानुरूप व-रीलच सांप्रदाय पाळितात हें खरें, तरी भूरीवारी, आनंदवारी, इत्यादिक त्यांचे सांप्रदाय वरील सांप्रदायाहून अगदीं भिन्न आहेत.

व्यासस्थापित उच्छिन्न झालेलें ज्ञानकांड शंकराचार्यांनीं यथापूर्व स्थापिल्यावर, त्यास नांव काय द्यावें याविषयीं ते विचार करूं लागले. कारण बौद्धानें, त्याच्या मतास अद्वैत नांव देऊन आपणास अद्वयवादी ह्मणविलें होतें. पुढें त्यांनीं पोक्त विचार करून, आपल्या सनातन वैदिक मार्गास शुद्धाद्वैत असें नांव दिलें. असो, विचार करून जर पाहिलें, तर बुद्ध अथवा बौद्धाचें अद्वैत मत, शांकर मताच्या फार खालचें आहे. तें असें कीं, बौद्ध हा विज्ञानवादी आहे म्हणजे तो बुद्धीला आत्मा मानणारा आहे. आणि व्यास किंवा शंकराचार्य ब्रम्हवादी म्हणजे ब्रम्हाला आत्मा म्हणणारे आहेत, यांत ब्रम्ह सत्यज्ञानानंत व बुद्धि क्षणविनाशी असल्यामुळें, बुद्धाचें अद्वैत क्षणिक आणि आचार्यांचें सनातन, असा त्यांत अतिशय मोठा फेर आहे.

आचार्यांनीं आपल्या सनातन वैदिक मार्गास शुद्धाद्वैत हें नांव ज्या अर्थावर दिलें, तो अर्थ कांहींच मनांत न आणतां, वल्लभाचार्यांनेंही आपल्या मतास तेंच नांव दिलें. परंतु हें नांव त्याच्या मतास शोभत नाहीं इतकेंच केवळ नव्हे, तर तें मुळीं सार्थच नाहीं, कारण साकार शुद्ध परमेश्वर व त्याचा भक्त साकार शुद्ध जीव, अशा अर्थानें शुद्ध पदाची सार्थकता क्षणभर झालीशी मानिली, तरी अद्वैत ह्या पदाची सार्थकता होत नाहीं. कारण, जीव आणि

ईश्वर हे दोघे वल्लभमतांत सेव्य सेवक अशा द्वैतानें युक्त आहेत. असो, परंतु या भानगडीमुळें प्रस्तुत असें करावें लागतें कीं, मूळच्या शुद्धाद्वैतास शांकरशुद्धाद्वैत अशी विशेष संज्ञा करावी लागते.

याप्रमाणें चार मठांच्या आंत राहणाऱ्या वैदिक धर्माच्या सर्व लोकांस, ज्या ज्या मुख्य मुख्य गोष्टींची माहिती असणें अत्यावश्यक आहे तिचा विचार येथें संक्षेपतः दाखविला. तर ही गोष्ट त्या सर्वांनीं लक्षांत धरून, अधिकारपरत्वें असणाऱ्या यथायोग्य वर्णाश्रम भेदावर दोषदृष्टि न करितां, आपण सर्व वैदिक धर्माचे आहों असें ध्यानांत आणून, भावाद्वैत बुद्धीनें सर्वांनीं परस्परांवर प्रीति ठेवावी व एकमेकांस परस्पर साह्य करावें.

आतां परमेश्वरानें केलेल्या अनुग्रहांत वास्तविक अर्थ काय आहे, व त्यांतील अर्थांत त्यानें आपणास काय सुचविलें आहे; इत्यादि कळून, त्यांतील अर्थ स्वयंप्रकाश अपरोक्षत्वानें अनुभूत व्हावा अशी ज्यांस इच्छा होते, ते ब्रम्हतत्ववेत्त्यांस शरण जातात, व निःसंशय समाधान पावून कृतार्थ होतात.

---

## प्रकरण दुसरें.

### ब्रम्हतत्ववेत्त्या गुरूचीं लक्षणें.

ब्रह्मतत्ववेत्त्यांचीं मुख्य लक्षणें दोन होत. तीं अशीं कीं, एक श्रोत्रियत्व आणि दुसरें ब्रम्हनिष्ठत्व, हीं लक्षणें श्रुतिप्रतिपाद्य असल्यामुळें एकेक लक्षणानें युक्त पुरुष मुमुक्षूस गुरुत्वेंकरून वरण्यास योग्य होत नाहीं. जशी कुंकुम आणि मंगलसूत्र या दोन चिन्हांनीं अलंकृत स्त्री मंगलकार्यांत प्रशस्त होते, तशी कुंकुम असून मंगलसूत्रहीन व मंगलसूत्र असून कुंकुमहीन प्रशस्त होत नाहीं; कारण ती तशी असतां क्रमेंकरून वेश्या व रजस्वलाच म्हटली जाते. त्याचप्रमाणें श्रोत्रिय असून ब्रम्हनिष्ठ नसेल

व ब्रम्हनिष्ठ असून श्रोत्रिय नसेल तर तोही मोक्षमार्गी गुरुत्वास प्रशस्त होणार नाहीं. श्रोत्रिय म्हणजे वेदाधिकारी असून वेदार्थवेत्ता व ब्रम्हनिष्ठ म्हणजे स्वात्मानुभवी असा अर्थ समजावा. हें प्रत्येक लक्षण येणेंप्रमाणें समजावें.

१ ब्रम्हतत्ववेत्ता श्रोत्रिय पाहिजे, म्हणजे त्यास ज्ञानकांड प्रकरणीं श्रुतीचें साकल्यें करून निदान मुमुक्षूंस बोध करण्यापुरतें तरी यथार्थ ज्ञान पाहिजे, शिवाय वेदाध्ययनाचा व दुसऱ्यास पढविण्याचाही वेदाज्ञेनें अधिकार पाहिजे. तात्पर्य ब्रम्हतत्ववेत्ता वेदज्ञ व अर्थज्ञ असा ब्राम्हण पाहिजे.

२ ब्रम्हतत्ववेत्ता ब्रम्हनिष्ठ पाजिजे. ह्मणजे त्यास सच्चिदानंद ब्रह्म आपणच आहों, असा ब्रम्हाचा साक्षात्कार स्वात्मत्वें करून पाहिजे. जसा अग्नि हा काष्टांत आहे, परंतु मंथनें करून प्रकट झाल्याशिवाय कार्यक्षम होत नाहीं, तसें ब्रह्म हें देहामध्यें असून, गुरुशास्त्र विचार द्वारा जर प्रकट झालें नाहीं, तर ते मुमुक्षूचें कार्य करण्यास समर्थ होणार नाहीं. ह्मणून ब्रम्हतत्ववेत्ता अशा प्रकारचा यथार्थ ब्रह्मनिष्ठ पाहिजे.

वरती जीं ब्रम्हतत्ववेत्त्याचीं लक्षणें सांगितलीं, त्यांतून पहिलें त्याच्या सदाचरणावरून ओळखतां येतें, व दुसरें, त्याच्यावर असलेली गुरुकृपा, तिजपासून त्याच्या ठायीं उत्पन्न झालेली निरुपाधिक नित्यानंदवृत्ति, व त्याची सज्जनांत असलेली प्रशंसा, या तिहींवरून समजतें. यांत पहिल्याचा दुसऱ्याशीं, तसाच दुसऱ्याचा तिसऱ्याशीं, जन्य जनक संबंध असल्यामुळें, पहिली गुरुकृपा तीच अत्यंत मुख्य आहे, व ती असल्याचें प्रमाण निरुपाधिक नित्यानंदवृत्तिवरून तेव्हांच जाणतां येतें. यासाठीं ओळखीचें मोठें चिन्ह तीच वृत्ति आहे. आतां निरुपाधिक आनंदवृत्ति म्हणजे सोपाधिक नव्हे ती, सोपाधिक म्हणजे, मद्यादिक मादक पदार्थाच्या सेवनानें जी वृत्ति क्षणिक आनंदित ती. तात्पर्य हर्षखेद रहित जी सतत निरुपाधिक आनंदवृत्ति, तीवरून ब्रम्हनिष्ठ-

तेची पूर्ण सहवासानें ओळख होऊं शकते.

गुरुकृपा ही सर्वत्रच प्रधान आहे. कोणतीही कां विद्या असेना, गुरुच्या कृपेनेंच ती शिष्यास सफल होते. वेदाध्ययनाविषयीं मनुनें मनुस्मृतींत याप्रमाणें म्हटलें आहे.

" ब्रह्मयस्त्वननुज्ञात मधीयानादवान्पुयात् "

" सब्रम्हस्तेयसंयुक्तो नरकंप्रातिपद्यते.

या श्लोकांतील अभिप्राय असा आहे कीं, कोणी गुरु आपल्या शिष्यास वेदाध्ययन पढवीत असतां, त्या पढणाराचें तें अध्ययन ऐकून जो वेदाध्ययन संपादन करितो, त्यास ब्रम्हस्तेय ह्मणजे वेदाची चोरी असें म्हटलें आहे, व असा जो वेदचोर त्यास, नरकगति होते असें सांगितलें आहे. कारण, समित्पाणि होऊन गुरुस शरण जावें व तें अध्ययन संपादावें असा जो विधि, तो त्यास न घडल्यामुळें निषिद्धाचरण घडलें. हाच न्याय, ब्रम्हशब्दाचा मुख्यार्थ जें परब्रम्ह, तत्संबंधी विद्याग्रहण करणारा विषयींही समजावा, म्हणून ब्रम्हतत्ववेत्ता विधीनें ब्रह्मविद्या साध्य केलेलाच असला पाहिजे.

आतां ब्रम्हतत्त्ववेत्ता ब्रम्हचारी इत्यादि आश्रमाचा असेल, तर तो त्याचा आश्रय सशास्त्र पाहिजे. म्हणजे ब्रम्हचारी असल्यास त्याच्या कंबरेस व्रतबंध समयींची खरी मुंज पाहिजे, नसल्यास सुटल्याचें योग्य कारण पाहिजे. याचप्रमाणें गृहस्थ व वानप्रस्थ यथायुक्त पाहिजेत असून, सन्यासही योग्य पाहिजे. म्हणजे तो विद्वत्संन्यासी किंवा विविदिषा उत्पन्न होऊन संन्यास केलेला असा पाहिजे. नसल्यास, त्याग होण्याचें कारण विधीस अनुसरून पाहिजे.

ब्रम्हतत्ववेत्ता ४ आश्रमांतून ज्या ज्या आश्रयाचा असेल, त्या आश्रमाप्रमाणें त्याचा मठ व संप्रदाय, प्रथम प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें जसा असावा तसाच असला पाहिजे. तात्पर्य गुरुत्व ज्यास करणें असेल, त्यास विधिनिषेध संभाळले

ठाणें.

पाहिजेत. त्याची ज्यास गरज नाहीं, त्यास अमुक करणें हा विधि व अमुक न करणें हा निषेध, मुळींच लागू नाहीं.

"ज्ञानामृतेनतृप्तस्यकृतकृत्यस्ययोगिनः"

"नचास्तिकिंचित्कर्तव्यमस्तिचेन्नसतत्त्ववित्"

---

## प्रकरण तिसरें.

### मुमुक्षु शिष्याचीं लक्षणें.

मुमुक्षु हा मुख्यत्वेंकरून साधनचतुष्टयसंपन्न असला पाहिजे. हीं लक्षणें श्रुतिप्रतिपाद्य असल्यामुळें यांतील कांहीं लक्षणें आहेत व कांहीं नाहींत, असा पुरुष पूर्ण मुमुक्षु होत नाहीं, आणि त्या कारणामुळें तो ब्रम्ह विद्येसही अधिकारी होत नाहीं; परंतु हीं च्यार लक्षणें, वर्णाश्रमानुरूप काम्यनिषिद्धविवर्जित वेदोक्त कर्म परमेश्वरार्पण बुद्धीनें झाल्या शिवाय प्राप्त होत नसल्यामुळें, प्रथम कर्मेंकरून चित्तशुद्धिद्वारा पुरुषानें साधनचतुष्टयंसपन्न होऊन मग आत्मप्राप्तीसाठीं सद्गुरूचा आश्रय करावा. यास प्रमाण रामगीता,

"आदौस्ववर्णाश्रमवर्णिताःक्रियाः
कृत्वासमासादित शुद्ध मानसः
समाप्यतत्पूर्वमुपात्तसाधनः
समाश्रयेत्सद्गुरूमात्मलब्धये ॥"

कर्म म्हणजे काय तें समजलें पाहिजे. यास्तव त्याचा प्रकार नित्यनैमित्तिक भेदानें येणें प्रमाणें समजावा. मलमूत्रोत्सर्ग झाला म्हणजे त्या इंद्रियांची यथाशास्त्र शुद्धि करावी. पुढें शरीरशुद्धीसाठीं मृत्तिकालेपनपूर्वक समंत्रक अशा शुद्ध जलेंकरून स्नान करावें. स्नानासाठीं मृत्तिका घेणें ती शेतामधील शुद्ध स्थळींची काळी चिकणमाती घ्यावी. स्नान झाल्यावर, शुचिवस्त्राचें परिधान करून व आसनावर बसून वेदप्रतिपाद्य अग्निहोत्राचें पवित्र भस्म धारण करावें. तदभावीं मृत्तिकेचा

( गोपीचंदनाचा ) ऊर्ध्व तीलक करावा. परंतु हा मृत्तिकातिलक प्रातःस्नान असतां मात्र विहित आहे. माध्यान्हीं किंवा सायान्हीं विहित नाहीं. पुढें शिखाबंधन, आसनविधी, भूतशुधि, अंतर्बहिर्मातृकान्यास, संध्योपासना, श्रौत अथवा स्मार्ताग्निउपासना, पंचायतनरूप देवतार्चन, या पंचायतन पूजेंत कोणी कोणतें पूजावें त्या विषयीं मनूनें असा नियम सांगितला आहे कीं, शिवपंचायतन ब्राम्हणानें, विष्णुपंचायतन क्षत्रियानें, सूर्यपंचायतन वैश्यानें, गणेशपंचायतन शूद्रानें, आणि या मुख्य चार वर्णांशिवाय सर्व उपवर्णांनीं, देवीपंचायतन पूजावें. परंतु केवळ नुस्ता बाण किंवा शालिग्राम कोणी कधींच पूजूं नये. अस्तु. देवतार्चनानंतर माध्यान्ह संध्या, ब्रम्हयज्ञ, तर्पण, नमस्कार, वैश्वदेव व बलिहरण, अतीथीसह भोजन, आणि सायंसंध्योपासन करावें, येणेंप्रमाणें हें नित्यकर्म समजावें. नैमित्तिक कर्म म्हणजे पितृतिथी, दर्श पूर्णमास, आदिकरून कृत्यें समजावींत. हें उभयरूप कर्म, फलाशारहित म्हणजे ईश्वरार्पण बुद्धीनें केल्यापासून चित्ताची शुद्धि होते न केल्यानें होत नसून शिवाय अकरण प्रत्यवायही घडतो. यास्तव जशी राजाज्ञा अनुल्लंघ्य असल्यामुळें पाळणेंच भाग आहे, मग ती कशीही असो, त्याचप्रमाणें हें कर्मानुष्ठान ज्यास त्यास, आपापल्या वर्णाश्रमास जें जें विहित, तें तें त्यास अनुसरून पाळणें भाग आहे.

अशा प्रकारें नित्यनैमित्तिक कर्म होतां होतां प्रथम मुमुक्षा उत्पन्न होते. मुमुक्षा म्हणजे, अज्ञानकृत बंधनापासून मोकळें होण्याची इच्छा ती असें समजावें. सारांश, अज्ञानजनित जें जन्ममरणरूप बंधन, त्यापासून सुटण्याची जी इच्छा ती मुमुक्षा होय. ही मुमुक्षा साधनचतुष्टयांतील पहिलें साधन आहे असें समजावें.

मुमुक्षा उत्पन्न झाली असतां, पुढें विवेक उत्पन्न होतो. विवेक म्हणजे विचार असा अर्थ समजावा, व तेणेंकरून या ब्रम्हांडांत

नित्य काय व अनित्य काय यांची निवड करतां यावी. ती अशी कीं, ज्यास उत्पत्ति व नाश नाहीं, सजातीय विजातीय आणि स्वगत भेद नाहींत, तसेंच देशतः कालतः आणि वस्तुतः असे तीन परिच्छेद नाहींत, अशा प्रकारचें एकच अद्वितीय, तसेंच सर्व व्यापी, त्रिकालाबाधित व सर्वात्मरूप असें जें कांहीं अनुपम तत्व तें मात्र सत्यज्ञानानंदरूप वस्तु नित्य व त्यावांचून इतर सर्व अनित्य, असा जो विचार त्यास नित्यानित्यविवेक म्हणतात. म्हणून हें साधन चतुष्टयांतील दुसरें साधन आहे.

विवेकानंतर वैराग्य उत्पन्न होतें. वैराग्य म्हणजे अनित्य म्हणून जेवढे पदार्थ आहेत, मग ते दृश्य भासात्मक रूपानें ऐहिक असोत कीं पारलौकिक असोत, त्यांच्या भोगाविषयीं ओकिल्या ओकाप्रमाणें जी वैरस्य बुद्धि म्हणजे अप्रीति तें, अथवा हें अन्न विषयुक्त आहे, असें आप्ताच्या (सत्यवक्त्याच्या) वचनानें कळलें असतां, भोजन करणारा कितीही क्षुधित असला, व तें अन्न कितीही उत्तम दिसलें, तरी तो त्या अन्नास जसा दोषदृष्टीनें पाहून त्याचा त्यागच करितो, त्याप्रमाणें बाधक विषयमात्राचा त्यागच करणें, त्याचें नाव वैराग्य होय, व हें साधन चतुष्टयांतील तिसरें साधन समजावें.

अशा प्रखर वैराग्यापासून अंतःकरणांत शमादि संपत्ति उत्पन्न होते. शमादि संपत्तीचे सहा प्रकार आहेत. त्यांचीं नांवें:—शम, दम, उपरति, तितिक्षा, श्रद्धा, आणि समाधान अशीं आहेत, त्या प्रत्येकाचें रूप येणेंप्रमाणें आहे.

शम म्हणजे, मनादिक अंतरिंद्रियांचा अनित्य विषयांकडून निग्रह करून, केवळ आनंदस्वरूप, सकलजगद्व्यापि, सर्व जगाच्या उत्पत्तीस परम कारण, इंद्रियगणांचा नियंता, आणि स्वयंप्रकाश, अशा नित्य परमेश्वर स्वरूपीं, भावनापूर्वक त्यास एकाकार करणें, त्याचें नांव उपासना होय. परंतु ही उपासना निर्गुण स्वरूपाची असल्यामुळें, उत्तमाधिकाऱ्यांस मात्र घडेल,

म्हणून तसा अधिकार ज्यास नसेल, त्यास सगुणाचेंच चिंतन केलें पाहिजे. व त्या साधनद्वारा निर्गुणोपासनेस पात्र झालें पाहिजे. तात्पर्य, उपासना ही, अंतःकरण स्थिर होण्यासाठीं आहे म्हणून, ती एकांतीं एकट्यानेंच केली पाहिजे, याशिवाय ती संशयविपर्ययरहित निश्चयात्मक बुद्धीनें, तशीच उपेक्ष्य द्वेष्यवृत्ति सोडून मोठ्या प्रीतीनेंही केली पाहिजे. सारांश, मनाची जी एकाकारता परमेश्वर स्वरूपीं होणें, त्याचें नांव शम अथवा तिचेंच नांव उपासना[1] होय.

२. दम ह्मणजे श्रोत्रादि बाह्येंद्रियांचा अनित्य विषयांकडून निग्रह तो.

३. उपरति म्हणजे अंतःकरण हें वारंवार विषयांकडे जातें, त्यास पुनः पुनः परमेश्वर स्वरूपीं स्थापन करणें ती.

४. तितिक्षा म्हणजे, शीतोष्ण सुखदुःखादि द्वंद्वाचें सहन करणें ती.

५ श्रद्धा ह्मणजे श्रीगुरूच्या (श्रोत्रीय ब्रह्मनिष्ठाच्या) आणि वेदांताच्या ह्मणजे वेदाचा अंत्य भाग जो उपनिषद्रूप ज्ञानकांड त्याच्या वचनावर दृढ विश्वास ती.

६. समाधान म्हणजे प्राप्तभोगीं संतोष वृत्ति तें.

येणेंप्रमाणें हें शमादिषट्क संपत्तिरूप चौथें साधन होय.

अशा प्रकारचा साधनचतुष्टयसंपन्न पुरुष ब्रम्हविद्येचा अ-

---

१ उपासना ह्मणजे कित्येक असें समजतात कीं, प्रतिमापूजन करणें, परंतु तसें नाहीं. कारण प्रतिमा पूजन हें बाह्येंद्रियांनीं होणारें आहे ह्मणून, त्याची गणना कर्मांत आहे. अलीकडे कित्येक मूर्खलोक समाज स्थापन करणार उत्पन्न होऊन, त्यानीं समाजांतील प्रार्थनेस उपासना नांव दिलें आहे, परंतु तींत चित्त स्थैर्याचा अभाव असल्यामुळें तिला उपासना हें नांव मुळींच देतां येत नाहीं. बरें तीस कर्म जर ह्मणावें तर तेंही नांव तिला ह्मणतां येत नाहीं, कारण तींत वेदोक्त विधीचाही अभाव आहे.

धिकारी होतो. ज्या स्त्रिया अशाच साधनसंपन्न होतात, त्यांसही हा अधिकार येतो. तात्पर्य अशा अधिकाऱ्यास ब्रम्ह विद्या उत्तम प्रकारें साध्य होते. जसा चातुरंग सैन्यानें युक्त बलाढ्य राजा शत्रूस जिंकून यशस्वी होतो, तसाच साधनचतुष्टयसंपन्न अधिकारी, कामक्रोधादि शत्रूंस जिंकून जीवन्मुक्तिरूप यश पावतो. अस्तु, असा हा अधिकारी आपली आपणास प्राप्ति होण्यासाठीं समिधापाणि होऊन म्हणजे काया, वाचा, आणि मन एतत्समर्पणपूर्वक श्रोत्रिय ब्रम्हनिष्ठास शरण जाऊन, मी अमुक शर्मा अथवा अमुक वर्मा ब्रह्मविद्या प्राप्त्यर्थ श्रीचरणास शरण आलों आहें असें म्हणून साष्टांग नमस्कार घालितो, व सेवा करीत जवळ राहतो म्हणजे सद्गुरूचा आश्रय करितो.

हा आश्रय करणारा अधिकारी आपल्या वर्णाश्रमानुरूप जसा असावा तसा यथायुक्त असतो. म्हणून त्याविषयीं विशेष सांगणें नको. तथापि विशेष इतकाच कीं, तो थोडें फार तरी वेदशास्त्राध्ययन केलेला असणें अवश्यक आहे. आतां स्त्रियाशूद्रांस जरी वेदाध्ययन नाहीं, तरी त्यांस शास्त्राध्ययन करण्यास प्रत्यवाय नाहीं, म्हणून त्यांस तो संस्कार थोडाबहुत असणें युक्त आहे; कारण त्या संस्कारानें त्यांस जें परमार्थमार्गाचें परिज्ञान असावें लागतें, तें असल्यानें गुरूस त्यांना तें सांगण्याचे परिश्रम पडत नाहींत.

मग अशा प्रकारच्या शरण आलेल्या अधिकाऱ्यास श्रोत्रिय ब्रम्हनिष्ठानें एक वर्षपर्यंत जवळ राहण्यास आज्ञा करावी, आणि त्याचा अधिकार यथायुक्त आहे असें प्रत्ययास आल्यावर त्यास ब्रम्हविद्या सांगावी. यास ज्या श्रुतीच्या आधारानें वचन प्रमाण आहे तें असें:—

" श्रद्धावतेपिनब्रूयादसंवत्सरवासिने ।
गुरुःशिष्याय विप्रास्तद्ब्रवाद्भिरपिगम्यते " (पिप्पलादोक्ति.)

आतां मुमुक्षु अधिकाऱ्यानें गुरुभक्तीस अनुसरून कसें वागावें, त्याविषयीं जे कांहीं विशेष नियम आहेत ते येणेंप्रमाणें:—

प्रथम मुमुक्षूनें प्रत्यहींचें प्रातःकाळचें स्नानसंध्यादि कर्म होतांच श्रीगुरुदर्शनास जावें. गेल्यावर जें कांहीं फलादिक उपायन नेलें असेल, तें पुढें ठेवून साष्टांग नमस्कार घालावा. नंतर गंध तुलसीपत्र मस्तकावर तसेंच चरणावर वाहून चरण तीर्थ पात्रांत घेऊन घरीं यावें, व भोजनास बसतांना आधीं तीर्थ प्राशन करून पुढें भोजन करावें. तात्पर्य असें कीं, प्रत्यहींचें दर्शन व तीर्थ ग्रहण झाल्याशिवाय मुमुक्षूनें भोजन करूं नये. मग तो मुमुक्षु, पुरुष किंवा स्त्री कोणीही असो. आतां जरी स्त्रिया बहुधा परतंत्र असतात, तरी त्यांनां मुमुक्षा झाली असतां, त्यांनीं त्यांस वरिष्ट जे पति आदिकरून कोणी असतील, त्यांनां आपला हेतु कळवून, या मार्गास लागण्यास मोकळीक मागावी व त्यानीं ती द्यावी.

मुमुक्षु पुरुषानें स्नानसंध्यादि प्रत्यहींचें कर्म झाल्यावर गंधाचा तिलक करावा व तो मध्यम प्रकारच्या अर्धचंद्राकृतीचा असावा. मुमुक्षु सौभाग्यवती स्त्रियांनीं, वेणी घातल्यावर कुंकुमतिलक करणें तोही तसाच ह्मणजे अर्धचंद्राकृतीचा करावा. याप्रमाणें हा तिलक वैदिक धर्मांत करणें अवश्य आहे; कारण एक तर तो सामुद्रिकोक्त महद्भाग्यसूचक मोठें भूषण आहे, व दुसरें अशौच चिन्हाचाही निवर्तक आहे. आपल्या कपाळावर स्त्रिया जो अर्धचंद्र गोंदतात, त्याचा तरी हाच मुख्य हेतु आहे.

हरएक मुमुक्षूनें वारंवार श्रीगुरुदर्शन घडावें म्हणून, त्यांची छवि संनिध ठेवावी. नित्यशः त्रिकालदर्शन ज्यांस नसेल, त्यांनीं प्रति गुरुवारीं व एकादशीस त्रिकाल गुरुदर्शन घेत जावें. मंगल दिवस व पुण्य दिवस हेही असेच दर्शना विषयीं प्रशस्त समजावेत. जे मुमुक्षु ग्रामांतरीं असतील, त्यांस नित्य दर्शन व पूजा होत नाहीं, यासाठीं त्यांनीं प्रतिवर्षी आषाढ शुद्ध पौर्णिमेस व्यासपूजेस आलेंच पाहिजे, जवळ असणाऱ्यांस तें दर्शन व पूजा आहेच आहे.

हरएक मुमुक्षूनें प्राप्तीचा पंधरावा भाग किंवा एक रुपयामागें प्रतिवर्षी एक आणा श्रीगुरुकारणीं लावावा, तसाच सामर्थ्य असल्यास संचित द्रव्याचाही पंधरावा भाग अगर वारस नसतां सर्वच समर्पण करावें. मंत्रगुरुहून, ब्रह्मविद्यादाता गुरु श्रेष्ठ आहे ह्मणून, परंपरा चालविणें ती ज्ञानगुरूचीच चालवावी, व ती परंपरा त्यांस मुखोद्गत असावी. शिवाय आपल्या संप्रदायाचें नांव व मूळ हें प्रत्येकास माहित असावें. श्रीगुरूचा आशीर्वाद, तूं कृतार्थ आहेस असा तर संपादिलाच पाहिजे, परंतु पुढें गुरुत्व करण्यास आज्ञा झाली तरच तें करण्यास लागावें. नाहींतर करूं नये. तसाच निवृत्तिविषयक नवा ग्रंथ करणें तोही श्रीगुरुप्रसादाशिवाय करूं नये.

मुमुक्षूनें एकादशीव्रत पाळणें तें स्मृत्युक्त पाळीत जावें. कारण तेंच मुख्य ऋषिप्रोक्त आहे. वेदामध्यें जप व उपवास करणें हें शुक्लकर्म सांगितलें आहे, परंतु उपोषण अमुकच दिवशीं करावें असा विधि केला नाहीं. पुढें स्मृतिकारांनीं, उपोषणांत मुख्य हेतु इंद्रियनिग्रह आहे असें जाणून, मनासहित दशेंद्रियांचा निग्रहसूचक, असा हा एकादशीचा दिवस सर्वसंमतानें उपोषणाविषयीं नियमित ठरविला. हें एकादशीच्या उपोषणाचें मुख्य तात्पर्य असतां, कित्येक अर्वाचीन व दुराग्रही वैष्णवानीं, दशमी तिथी ब्रह्मदेवाची, एकादशी शिवाची अथवा तदंश रुद्राची, व द्वादशी विष्णूची, अशा पुराणाधारें कल्पना काढून, होईल तेथपर्यंत द्वादशीस उपोषण पडण्यासाठीं, त्या स्मार्त एकादशीस, विद्धत्वाचे, तसेच सूर्यानें ती तिथी न पाहिलेल्याचे, वगैरे अनेक दोष देऊन द्वादशीस उपोषण ठरविलें, व त्या उपोषणास एकादशीचें उपोषण असें नांव दिलें. परंतु या उपोषणांत वर जो हेतु दाखविला तो तर मुळींच नाहीं, व शिवाय ऋषिप्रोक्तत्वही नाहीं. आतां हा दुराग्रहच आहे कीं नाहीं हे ज्यांस पाहणें असेल, त्यांनीं तो असा पहावा कीं, कि-

त्येक एकादशी तिथीस विद्धादि कांहींएक दोष नसतां, द्वादशीस उपोषण घडण्यासाठीं मध्वमतच्या च्यार घटका उसन्या घेऊन त्रयोदशींत पारणें होणें युक्त होय, असा एक शास्त्रार्थ त्यांनीं कल्पित उभा केला आहे. खरोखर जर पाहिलें, तर वैष्णवांनीं अगर भागवतमतवाद्यांनीं, इतक्या फानगडी करण्यापेक्षां, आह्मांस एकादशीचें उपोषण पाळणें नाहीं, तर द्वादशीचेंच उपोषण पाळायाचें असें तरी ह्मणणें बरें होतें. परंतु द्वादशीस उपोषण करून त्याचें नांव एकादशीचें उपोषण ठेवणें हा निवळ मिथ्याचार आहे.

भागवत एकादशी त्याच दिवशीं खरी म्हणतां येईल कीं, ज्या दिवशीं सूर्यग्रहण अथवा चंद्रग्रहण, स्मार्तांचें ग्रहण आज तर उद्यां भागवतांचें किंवा वैष्णवांचें असें निराळें होईल. तसें जर कधीं झालें नाहीं, होत नाहीं व होणार नाहीं, असें निश्चयात्मक खास आहे, तर दुसरी एकादशी निवळ खोटी, असें मुमुक्षूनें समजलें पाहिजे. अस्तु; आतां येथें इतकेंच मुमुक्षूस सांगणें आहे कीं, ज्याच्या घरांत कुलपरंपरेनें द्वादशीचें उपोषण करण्याचा प्रचार चालत आला असेल, व त्या उपोषणाची ज्यास भीडच पडत असेल, त्यानें खऱ्या एकादशीस न जेवतां, तें उपोषण पाळून पाहिजे तर द्वादशीस उपोषण करावें.

आता मुमुक्षु जो आहे, तो निजगुरूस कसें पाहातो, त्याचा विचार असा आहे कीं, तो श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ गुरूस परमेश्वरबुद्धीनें पहातो मनुष्य बुद्धीनें पहात नाहीं. याचें कारण मागें असें लिहिलें आहे कीं, ज्या काष्टांत अग्नीचें प्राकट्य होतें, तेथेंच जशी कार्यक्षमता असते, त्याचप्रमाणें ज्या देहांत, गुरुशास्त्र विचारानें परमात्म्याचें प्राकट्य झालें आहे, तेथेंच मुमुक्षु समाधान पावेल; अन्यत्र नाहीं. तात्पर्य, जेथें ब्रह्माचा साक्षात्कार स्वात्मत्वानें आहे, तेथें मुमुक्षु जर विश्वासेल तर कृतार्थ होईल, न विश्वासेल तर अन्यथा होईल; जसा कल्पवृक्षा खालीं जाऊन,

उत्तम मनोरथ करणारा उत्तम फळ पावेल, विपरित मनोरथ करणारा विपरीत फळ पावेल त्याप्रमाणें.

येणेंप्रमाणें हीं तीन प्रकरणें केवळ पारमार्थिक मनुष्यांकरितां होत, असें समजावें. यामध्यें दुसऱ्या प्रकरणांत गुरु कसा असावा तें लिहून ह्या तिसऱ्या प्रकरणांत शिष्य कसा असावा तेंही लिहून दाखविलें आहे. याचें कारण इतकेंच कीं, आलीकडे धूर्त लोकांनीं, यांत सांगितल्याप्रमाणें योग्यता नसतां, गुरुत्वाचें ढोंग माजवून अनेक मुमुक्षूस भवसागरांत बुडविलें आहे. त्याचप्रमाणें धूर्त शिष्यांनीं, अनेक उत्तम गुरूंस लटके भाव दाखवून, फसविल्याचीं ही पुष्कळ उदाहरणें आहेत. तसा प्रकार येथून पुढें तरी घडूं नये. याविषयीं असें आढळतेंः—

सद्गुरुवीण सच्छिष्य। तो वायां जाय निःशेष।
का सच्छिष्येंवीण विशेष। सद्गुरु शिणें॥ २॥
उत्तम भूमि शोधिली शुद्ध। तेथें बीज पेरिलें कीडखाद।
उत्तम बीज परि संबंध। खडकाशीं पडला॥ ३॥
तैसा सच्छिष्य तो सत्पात्र। परी गुरु सांगे मंत्र तंत्र।
तेथें अत्रनापरत्र। कांहींच नाहीं॥ ४॥
अथवा गुरु पूर्ण कृपा करी। परी शिष्य अनधिकारी।
भाग्य पुरुषाचा भिकारी। पुत्र जैसा॥ ५॥
म्हणोन सद्गुरु आणि सच्छिष्य। तेथें न लगती सायास।
त्या उभयतांचा हव्यास। पुरे एकसरां॥ ६॥ [दासबोध.]

"यस्यदेवेपराभक्तिर्यथादेवेतथागुरौ
तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशंते महात्मनः"

( प्रापंचिक भाग. )

# प्रकरण पहिलें.

## प्रपंच साधून परमार्थ साधणारांचीं लक्षणें.

जो प्रपंच करील प्रमाण । तोच परमार्थ करील जाण ।
प्रपंचीं जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ॥ ( दासबोध. )

परमार्थ साधूं इच्छिणाऱ्या प्रपंचिकांस आधीं प्रपंच यथाशास्त्र करितां आला पाहिजे, वैदिक धर्माचे जे लोक च्यार मठांच्या आंत राहातात व शांकरशुद्धाद्वैतास मानतात, त्यांस निदान एवढी गोष्ट तरी प्रथम ध्यानांत पाहिजे कीं, आपण मूळ ईश्वरानुगृहित आहों व महा समर्थ मंत्रद्रष्टया ऋषींचे वंशज आहों, आणि त्या कारणामुळें परस्पर बहीणभांवडांप्रमाणें नातेवाईक असून, एकमेकांवर प्रीति व एकमेकांस साह्य करण्यास योग्य आहों. आतां जरी हें आमचें नातें पृथ्वीवरील सर्व मनुष्यांशीं आहे असें आम्ही समजून आहों, तरी कित्येक महत्वाकांक्षी धूर्त लोकांनीं मनःकल्पित नवे नवे धर्म काढिले असतां, ते ज्यांनीं भ्रांतीनें खरे मानून त्यांचा स्वीकार केला व आपणास त्या योगानें भ्रष्ट करून घेतलें, त्यांस स्वतः या गोष्टींची समज नसल्यामुळें आमचा उपाय हरला आहे.

असो; शांकरशुद्धाद्वैत मताच्या लोकांनीं, किंवा तशींच ज्यांस ही शिकवण मानेल त्यांनीं, परस्परांशीं सत्य व प्रिय असेंच भाषण करीत गेलें पाहिजे; असत्य प्रिय, व सत्यं अप्रिय, असें कधींही बोलत जाऊं नये. याविषयीं मनूचें बचन याप्रमाणें आहे.

"सत्यंब्रूयात्प्रियंब्रूयान्नब्रूयात्सत्यमप्रियं ।
प्रियंचनानृतंब्रूयादेषधर्मःसनातनः ॥

सत्य बोलण्यांत कित्येक प्रसंगीं तारतम्य आहे, यास्तव कधीं-कधीं त्याकडे दृष्टी देऊन आमच्या लोकांनीं वागत गेलें पाहिजे

ते प्रसंग हेच कीं, कोणाचें जमून आलेलें योग्य लग्न मोडत असेल, कोणाच्या योग्य रतीचा भंग होत असेल, कोणाची निष्कारण प्राणहानि होत असेल, कोणाचा सर्वस्व धननाश होत असेल व कोणी ब्राम्हण निष्कारण संकटांत पडत असेल, म्हणजे पांच प्रसंग कोणावर गुजरले असून, जर आपल्या मिथ्या भाषणानें ते त्यावरील टळत असतील, तर मिथ्या भाषण करणें सदोष होत नाहीं. या विषयीं भारतामध्यें असें वचन आहेः—

" विवाहकालेरतिसंप्रयोगेप्राणात्ययेसर्वधनापहारे "

" विप्रस्यचार्थेह्यनृतंवदेतपंचानृताण्याहुरपातकानि. "

परंतु अशा प्रकारचें कांहीं कारण नसतां, जे मनुष्य मिथ्या भाषण करितात, अथवा एक बोलून एक करितात, त्यांची वाचा यमदूत सांडसानें तोडतात. अशाविषयीं काशीराजानें वचन बालाकि नामक ब्राम्हणास असें आहेः—

" अकारणंहियोवाक्यंमृषाब्रूयान्नराधमः ।

" तस्यजिव्हानिकृंततिसंदंशैयमकिंकराः ॥ "

मनुष्यप्राण्यानें प्राणहीं जाऊं लागला तरी अकर्तव्यास कधींही प्रवृत्त होऊं नये. तर कर्तव्य तेंच करावें. त्याचप्रमाणें परस्त्रीच्या ठायीं कर्मेंकरून, मनेंकरून व वाणीकडूनही कधीं रत होऊं नये. जो कोणी कर्मादिकांनीं परस्त्रीशीं रत होतो, तो इहपर भय पावतो. याविषयीं असें आढळतेंः—

" अकर्तव्यंनकर्तव्यंप्राणैःकंठगतैरपि ।

" कर्तव्यमेवकर्तव्यंप्राणैःकंठगतैरपि ॥ १ ॥

" परदारान्नगच्छेद्धिकर्मणामनसागिरा ।

" तांगच्छन्भयमागच्छेदिहलोकेपरत्रच ॥ २ ॥ "

मनुष्यमात्रास चोरी करणें हेंही परम निंद्य आहे. चोरी म्हणजे दरवडा घालणें वगैरेच असें केवळ समजूं नये. तर चोरी म्हणजे तीच होय कीं, कोणीही मनुष्य आपला संबंधी असो

अगर नसो, त्याची हरएक वस्तु त्यास न पुसतां घेणें. ही गोष्ट भारतामध्यें शंखऋषि व लिखितऋषि या दोघां भावांच्या उदाहरणावरून स्पष्ट समजुतींत येते. सारांश कोणी उदार पुरुषांनीं, देव ब्राम्हणाकरितां ज्या धर्मादायाच्या नेमणुकी केल्या आहेत, त्याचप्रमाणें कीर्तीकरितां जी नेमणूक केली आहे, त्यावरील अधिकाऱ्यांनीं वगैरे मालकास न कळूं देतां, जो त्यांतील जिन्नस वगैरेचा अपहार करणें, अथवा ज्यास तो जिन्नस वगैरे द्यावयाचा, त्यास नाडून त्याजवळून खुषीनें अगर जुलमानें कांहीं अंश घेणें, तिला चोरी असेंच म्हटलेलें आहे.

मनुष्यमात्रानें मद्यमांस सेवन करूं नये. शुक्राचार्यांचा निर्बंध होण्यापूर्वी, मद्यपान करण्यांत जरी दोष नाहीं असें मनूनें म्हटलें आहे, तरी शेवटीं त्यापासून निवृत्तच होणें इष्ट होय असें सांगितलें आहे. तें मनूचें वचन असें आहे:—

" नमांसभक्षणेदोषोनमद्येनचमैथुने ।
प्रवृत्तिरेषाभूतानां निवृत्तिस्तुमहाफला ॥ "

शुक्राचार्यांचें वगैरे मद्यसेवनाविषयीं निषेधवाक्य आहे तें असें:—

" योब्राम्हणोद्यप्रभृतीहकश्चिन्मोहात्सुरां-
पास्यतिमंदबुद्धिःअपेतधर्माब्रम्हहाचैवसः
स्यादस्मिन्लोकेगर्हितःस्यात्परेच "
" यस्यकायगतंब्रम्हमद्येनाप्लाव्यतेक्वचित् ।
तस्यव्यपैतिब्राम्हण्यंशूद्रत्वंचसगच्छति ।
सुरावमलमाख्यातंपाप्माचमलमुच्यते
तस्माद्ब्राह्मणराजन्यौवैश्यश्चनसुरांपिबेत् "

अर्थ असा कीं, जो ब्राह्मण मोहेंकरून आजपासून मद्य प्राशन करील तो मंदबुद्धि होय. कारण मद्यप्राशनापासून तो धर्मबहिष्कृत होऊन ब्रम्हहत्यारूप पातकानेंही युक्त होईल, आणि त्या योगानें येथें व परलोकींही निंद्यत्व पावेल. ज्याच्या शरी-

रावर ब्रम्हत्व म्हणजे ब्राह्मणत्व आहे, किंवा ज्याच्या हृदयांत वेद राहतो, तो मद्य प्राशितो तर, त्याचें ब्राम्हण्य तेणेंकरून नाहींसें होऊन तो शूद्रता पावतो. सुरा म्हणजे मद्य, हा मल आहे, म्हणून तो मल पिणारा मलरूपच म्हटला जातो. यासाठीं वेदाधिकारी जे ब्राम्हण, क्षत्रिय आणि वैश्य, या तीन वर्णांनीं कधींही मद्यपान करूं नये. याचप्रमाणें मांसभक्षणही निंद्य समजावें.

"लोकेव्यवायामिषमद्यसेवानित्यास्तुजंतोर्नहितत्रचोदना ॥
व्यवस्थितिस्तेषुविवाहयज्ञसुराग्रहैरासुनिवृत्तिरिष्टा ॥
—( भाग० ११ स्कं० )"

लोकांमध्यें व्यवाय म्हणजे मैथून, आमिष म्हणजे मांस आणि तसेंच मद्य, यांचें सेवन मनुष्यमात्रांस नित्य प्राप्त असल्यामुळें, तें सेवन करावें असा अपूर्व विधि नाहीं. यास्तव व्यवस्था अशी केली आहे कीं, मैथून करणें तें विवाह करून प्रजार्थ करावें, त्याचप्रमाणें मद्यमांस सेवन करणें तर यज्ञ करून करावें, परंतु होईल तेथपर्यंत यापासून निवृत्त होणेंच इष्ट आहे.

जरविवाह विधीनें मैथून करणाऱ्यांस देखील इतका प्रतिबंध आहे, तर पुनर्विवाहास प्रतिबंध आहे हें सांगावयासच नको, आणि यावरूनच विवाह प्रकरणांत नियोगविषयक मंत्र नाहींत. तसाच त्यांत विधवेला पुनःविवाहही नाहीं. विद्वान् ब्राम्हणांनीं अशा प्रकारचा विवाह पशुधर्म समजून निंद्य केला आहे. तर मग हा निघाला कोठून? असें कोणी पुसेल, त्यास याचें उत्तर असें आहे कीं, वेन या नांवाचा कोणी राजा पूर्वी झाला होता, तो राज्य करीत असतां त्यानें हा चालू करून वर्णसंकर केला. तेव्हांपासून मोहेंकरून गतभर्तृकांस प्रजोत्पादनार्थ लोक स्वीकारूं लागले, परंतु साधूंनीं हा निंद्य केला आहे. याच अर्थावर मनुस्मृतींत मनूचीं वचनें आहेत तीं अशीं:—

" नोद्वाहिकेषुमंत्रेषुनियोगःकीर्त्यतेक्वचित् । "
" नविवाहविधावुक्तंविधवावेदनंपुनः ॥ "

" अयंद्विजैर्हिविद्वद्भिःपशुधर्मोविगर्हितः । "
" मनुष्याणामपिप्रोक्तोवेनेराज्यप्रशासति ॥ "
" समहीमखिलांभुंजन्राजर्षिप्रवरःपुरा । ",
" वर्णानांसंकरंचक्रेकामापेहतचेतनः । "
" ततःप्रभृतियोमोहात्प्रमीतपतिकांस्त्रियं । "
" नियोजयत्यपत्यार्थंतंविगर्हंतिसाधवः ॥ "

याच गोष्टीच्या निंद्यत्वाविषयीं अंबा नामक राजकन्येस शाल्व राजानें काय ह्मटलें आहे तें खालील वचनांत पहाः—

" गृहीतात्वंवरारोहेभीष्मेणपश्यतोमम ।
" रथेनस्थापितातेननगृह्णिष्येकरंतव ॥ १ ॥
" परोच्छिष्टांचकःकन्यांगृण्हातिमतिमान्नरः ।
" अतोहंनगृह्णिष्यामित्यक्ताभीष्मेणमालयवत् ॥ २ ॥

भीष्मानें अंबेस तिच्या भगिनींसहित जिंकून नेल्यावर, विचित्रवीर्याशीं तिचा विवाह होऊं लागला असतां, ती भीष्मास असें म्हणाली कीं, मी मनेंकरून शाल्व राजास वरिलें आहे, यास्तव मला त्याच्याकडे पोहोंचवा, त्यावरून भीष्मानें तिला तिकडे पोहोंचविलें. तेव्हां तिला पाहून शाल्व म्हणाला, हे सुंदरी, मजसमक्ष भीष्मानें तुला रथांत घालून जिंकून नेल्यामुळें, मी तुझें पाणिग्रहण करणार नाहीं. परोच्छिष्ट झालेली कन्या, कोणता बुद्धिमान पुरुष ग्रहण करील? म्हणून हुंगून टाकिलेल्या फुलाप्रमाणें भीष्माकडून, तूं टाकिली गेलीस असल्यामुळें मला ग्राह्य नाहींस. त्यावरून अंबा भीष्माकडे परत येऊन याप्रमाणें बोललीः—

" शाल्वोमुक्तात्वयांवीरनगृण्हातिकरेणमां "
" त्वंगृहाण महाभाग मरिष्याम्यनथाह्यहं "

हे वीरा, तूं मला शाल्वाकडे जाण्यास मोकळीक दिल्यावर मी तिकडे गेल्यें, पण तो माझा स्वीकार करीत नाहीं. यास्तव हे महाभाग, तूं माझा अंगीकार कर, नाहीं तर मी मरेन. तेव्हां भीष्म तिला म्हणतोः—

" अन्यचित्तांकथंत्वांवैगृण्हामिवरवर्णिनी "
" पितरंस्वंवरारोहेव्रजशीघ्रंनिराकुला "

भीष्म म्हणाला, अन्याकडे चित्त गेलेली अशी जी तूं, त्या तुला, हे सुंदरी, मी कसा ग्रहण करूं? यास्तव तूं व्याकुल न होता, आपल्या मातापित्याकडे जा. तात्पर्य मनोच्छिष्ट स्त्रीशीं समागम करणें; हें जर इतकें निंद्य क्षत्रिय मानीत होते, तर अंगोच्छिष्ट मानीत होतेच हें उघड आहे. अर्थात हें निंद्य कर्म ब्राम्हणांस त्याज्य आहेच आहे. असो, पतिव्रतेविषयीं सावित्रीची उक्ति य मार्शी अशी आहेः—

" पतिव्रताचैकपतौद्वितीयेकुलटास्मृता "
" तृतीयेधर्षणीज्ञेयाचतुर्थेपुंश्चलीत्यपि "
" वेश्याचपंचमेषष्ठेपुंगीचसप्तमेऽष्टमे "
" ततऊर्ध्वमहावेश्यासाऽस्पृश्यासर्वजातिषु. "

याचा अर्थ असा कीं, जिला विवाहाचा एकपति तीच पतिव्रता होय. एक पति मृत झाला असतां, अथवा जिवंत असतां, त्यास सोडून दुसरा पति करित्ये, ती कुलटा समजावी. याचप्रमाणें तीन, चार, पांच, व साहा, तसेच सात व आठ पति करणारी, क्रमें-करून धर्षणी, पुंश्चली, वेश्या व पुंगी म्हटली जात्ये. यापुढें आणखी पति करणारी, तिला महावेश्या नांव असून ती सर्व वर्णांस स्पर्श करण्यास आयोग्य होत्ये.

राजा तोच होय कीं, ज्याच्या राज्यांत चोर, कृपण, मद्यपी, इत्यादि अमार्गवर्ती लोक नाहींत, ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, हे चार वर्ण आपापलीं कर्में यथाशास्त्र पाळितात, निष्कारण भिक्षा कोणी मागत नाहीं, तात्पर्य, चोर, चाहाड, मद्यपी, व्यभिचारी, कृपण, वर्णाश्रम, धर्म न पाळणारे, इत्यादिक ज्याच्या राज्यांत नाहींत, त्यासच राजा असें म्हणावें. हीच गोष्ट भारतामध्यें केकय राजाचा व एका राक्षसाचा संवाद आहे, त्यावरून स्पष्ट होत्ये. साम्प्रतच्या राज्यांत हे सर्व प्रकार विपरीत आहेत, म्हणजे असे

कीं, चोरीच्या बंदोबस्तावरीलच लहान मोठे अधिकारी चोर आहेत. मद्यपान प्रजेमध्यें अधिक वाढेल तोच उपाय राजा करीत आहे. जेणेंकरून लोक अधिक संकटांत पडून तसेच दरिद्री दुःखी व निर्बळ होऊन, दुर्जन प्रबळ होतील, असे नवे नवे नियम ( कायदे ) होत आहेत व चालू आहेत. अशा प्रसंगीं आजपर्यंत लोकांनीं हेळसांड केली हेंच चांगलें झालें नाहीं, परंतु या पुढें तरी त्यांनीं जागें होऊन लोकांत एकमत न होऊं देण्याचा जो राजाचा प्रयत्न चालू आहे तिकडे वळूं नये.

लोकांनीं वेदोक्त आचार यथास्थित पाळूं नयेत, असे उपदेश ब्रम्हबंधूनीं जे आलीकडे चालविले आहेत, ते त्यांनीं ऐकूं नयेत, कारण, त्या उपदेशांनीं परमेश्वरप्राप्तीचा मार्गच बंद होणारा आहे. यास्तव सर्वांनीं जगद्गुरु श्रीमच्छंकराचार्यांच्या साह्यानें एकमत होण्याचा प्रयत्न करून स्वधर्म संरक्षण करावा.

---

# प्रकरण दुसरें.

## मुलांस वागविणें.

आईबापांनीं, आपापल्या मुलांस लहानपणापासून चांगल्या रीतीनें वाढवावें व वागवावें. त्यांस शिव्या देण्याचें वळण बिलकूल लागूं देऊं नये. असत्य भाषण तीं करतील असें त्यांनींच मुळीं वागूं नये, म्हणजे मग तींही वागणार नाहींत. चोरी, व्यभिचार, मद्यपान, इत्यादिकांतील दोष त्यांस सांगून ठेवावे. पुढें तीं जसजशीं मोठीं होतील, तसतसें त्यांस जें जें करायास सांगायाचें, तें तें निश्चयात्मक शद्बांनीं सांगावें. म्हणजे जा, अमुक काम कर, अशा प्रकारें सांगावें. जातोसना? करतोसना? अगर, जातोस का ? करतोस का? अशा शद्बांनीं सांगितलें असतां, त्याच्या मर्जीवर ठेवल्या सारखें होऊन तो कदाचित जातो अगर, जात नाहीं, करतो अगर करीत नाहीं, असें

म्हणेल, त्या योगानें आपली आज्ञा मोडली जाऊन, असें होतां होतां तीं स्वछंदीही होतील. तर तसें नहोण्यासाठीं फार जपावें.

आईबापांनीं मुलांस लहानपणापासून आपण मूळचे ईश्वरानुगृहीत, ऋषींचे वंशज, व व्यास किंवा शांकरशुद्धाद्वैताचे आहों, असें मोठ्या अगत्यानें शिकविलें पाहिजे, व त्यांकडून प्रातःस्नानादिकांचा पाठ ठेवविला पाहिजे. यांत हयगय होऊं देतां कामास नये. याशिवाय वाणीच्या शुद्धीसाठीं, त्यांस हळूंहळूं रामरक्षा, व शिवकवचादिक स्तोत्रें पढवून, आनंदगिरिकृत शंकरविजय तोही त्यांकडून अगत्य पाठ करविला पाहिजे.

पुढें त्यांस वाचावयास व लिहायास शिकवून, वर्णाश्रमानुरूप त्यांचा व्रतबंध झाल्यावर लागलीच त्यांची सोडमुंज न करितां, त्यांस आईबापांनीं आचार्यगृही म्हणजे गुरुगृहीं वेदाध्ययनासाठीं ठेवावें. तेथें त्यांनीं आपल्या शाखेच्या सर्व वेदाचें अध्ययन करणें हें उत्तम होय. तथापि जर आईबापांस व त्यांस तसें करणें नको असेल, तर तीन संध्या, ब्रम्हयज्ञ, तर्पण, देवपूजा, वैश्वदेव, बलिहरण, आणि दशोपनिषदें इतकें पढणें अवश्यक असून, येवढें अध्ययन होईपर्यंत आईबापांनीं त्यांस गुरुगृहींहून हलूं देतां कामास नये.

आलीकडे पोरें फारच विलक्षण निघालीं आहेत. तीं अशीं कीं, त्यांस थोरांशीं नम्रतेचें, बरोबरीच्याशीं सलगीचें आणि कनिष्ठाशीं कार्यापुरतें भाषण करण्याचें वळणच नाहींसें झालें आहे, याशिवाय शेंडी पाहिजे तेवढी ठेवावी, तिजभोंवते हवे तितके व हवे तेवढे घेरे राखावे, परंतु हें चांगलें नाहीं. मस्तकावर शेंडी राखणें हें वैदिक धर्माचें चिन्ह आहे. यास्तव ती ठेवण्यांत कांहीं तरी प्रमाण असलें पाहिजे. म्हणून गुरुगृहींहून गुरूस गुरुदक्षिणा देऊन नि-

घाल्यावर, देशरुढीप्रमाणें समावर्तन म्हणजे सोडमुंज[1] करावी, व जटानिवृत्त करून शेंडी राखणें ती गाईच्या खुराइतकी मोठी राखावी, व तीस गांठ मारतां येईल इतकी ती लांब असावी. याचप्रमाणें मुलींनींही केशपाश गाईच्या खुराएवढाच बांधावा. हा केशपाश तीन किंवा पांच पेडी असला पाहिजे. कारण, पुरुषांप्रमाणें स्त्रियांस मस्तकावरून नित्यस्नान नाहीं. यास्तव, तें स्नानफल त्यांस तेणेंकरून प्राप्त होतें. ज्या स्त्रिया अशी वेणी घालीत नाहींत व मस्तकावरून नित्य स्नानही करीत नाहींत, त्या वैदिक मार्गांत अस्नात अशा समजल्या जातात. आतां जिचे केश स्वाभाविकच लांब आहेत, तिचा केशपाश जेवढा होईल तेवढा होवो, मात्र तो बुद्धचा भर घालून मोठा केलेला नसावा, एवढेंच यांतील तात्पर्य आहे. असो, मुलींस मुलांप्रमाणें वेदाध्ययन नाहीं. यास्तव तें त्यांस करणें जरी अशास्त्र आहे, तरी मुलगे काव्य पढूं लागले असतां, त्यांबरोबर ते पढण्यास तिला प्रत्यवाय नाहीं. घरधंदा शिकणें हें तर त्यांस आहेच आहे.

आईबापांनीं आपापल्या मुलग्यांकडून वेळच्या वेळीं तिनींही संध्या करविण्यांत आळस करतां कामा नये; कारण संध्येचें स्वाभाविक फल, मनु व याज्ञवल्क्य यांनीं असें सांगितलें आहे कीं, दिवसास संध्या केल्यानें रात्रीचें, व रात्रीच्या संध्येनें दिवसाचें अज्ञानकृत पाप नष्ट होतें, मनु व याज्ञवल्क्य यांचीं संध्येविषयीं वचनें आहेत तीं अशीं:—

" पूर्वांसंध्यां जपंस्तिष्ठन् नैशमेनोव्यपोहति ।
पश्चिमांतु समासीनो मलंहंति दिवाकृतं ॥ १ ॥

---

१. सोडमुंज करणें ती लग्न कालाशिवाय करूं नये. कारण, मुंज सुटली गेल्यानें त्याचें ब्रम्हचर्य नष्ट होऊन, लग्न न झाल्यानें गृहस्थत्वही त्यास नसतें, आणि अशा कारणामुळें त्याची गणना कोणत्याच आश्रमांत होत नसून कर्माविषयीं त्यास अडचण मात्र होते. कंबरेस मुंज असलेला मुलगा मेला असतां पिशाच होतो, म्हणून सोडमुंज करितात, परंतु तो पिशाच होत नाहीं, ती कल्पना खोटी आहे.

दिवावायदिवारात्रौ यदज्ञान कृतंभवेत् ।
त्रिकाल संध्याकरणात्तत्सर्वंविप्रणश्यति ।। २ ।। ”

त्रिकाल संध्या करण्यांत पूर्वीचे लोक किती तत्पर असत, त्याविषयींचें एक ठळक उदाहरण असें आहे कीं, एकदां पांडवासहवर्तमान कृष्ण हा, भीष्मनीति श्रवण करून हस्तिनापुरास परत ला असतां, अस्तसमय होऊन संध्येची वेळा झाली असें पहातांच, दृषद्वती नदीवर उतरला, आणि स्नान करून संध्या झाल्यावर मग हस्तिनापुरांत प्रवेशला. या विषयीं हें खालीं लिहिलेलें भारतशांतिपर्वांतील वचन पहाः—

“ दृषद्वतिंचाप्यवगाह्यसुव्रताः
कृतोदकार्थाःकृतजप्यमंगलाः ।
उपास्यसंध्यांविधिवत्परंतपा-
स्ततःपुरंतेविविशुर्गजाव्हयं ।। ”

संध्या करणे जसें सर्वांस अवश्य आहे असेंच देवतार्चनही आहे. सर्व वर्णांस शिवपूजनच मुख्य आहे. तथापि तें कोणास आवडतें व कोणास आवडत नाहीं, असें जाणून मनूनें नियम ठरविला आहे तो असा आहेः—

“ विप्राणांदैवतंशंभुःक्षत्रियाणांतुमाधवः ।
वैश्यानांचभवेतब्रम्हा शूद्राणां गणनयाकः ।।
ब्राम्हणाचारदेवास्युरीशोविष्णुर्दिनेश्वरः ।
उमागणपतिश्चैवतेषां पूजापरानराः ।
ब्रम्हार्पणधियाकामान् परित्यज्जाचरंतिते ।
एवंकृतेनित्यकर्मण्यमलेमनसिप्रभो ।। ”

श्रीराम, श्रीकृष्ण, व अर्जून, हे शिवपूजाच करीत असत, मांधाता आदिकरून कित्येक राजे शिवपूजाच करीत, इत्यादिक याविषयींचीं ठळक उदाहरणें असून, अंबरीष आदिकरून कित्येक राजे मनूच्या वचनाप्रमाणें विष्णुपूजातत्परही असत. परंतु हे सर्व पंचायतनपूजक होते. एकटा बाण किंवा एकटा शालि-

ग्राम पूजणारे नसत. रामचंद्र, सीतेसहित विमानांत वसून लंकेहून अयोध्येस येण्यास निघाला असतां, रामेश्वरास उद्देशून तो सीतेस जें बोलला तें असें आहेः——

" एतच्च दृश्यतेतीर्थं सागरस्य महात्मनः ।
सेतुबंधमितिख्यातं त्रैलोक्येनचपूजितं ॥
एतत्पवित्रं परमंदर्शनात्पातकापहं ।
अत्ररामेश्वरोदेवो मयाशंभुः प्रतिष्ठितः ॥ "

महाभारतामध्यें कर्णपर्वांत कृष्णार्जुन उभयतां शिवपूजा करून नंतर युद्धास गेले असें लिहिलें आहे. तो नियम त्यांचा प्रत्यहींचाच होता. तें भारतांतील वचन संजयाचें धृतराष्ट्रास असें आहे:—

" अथपुरुषवरौकृताह्निकौभवमभिपूज्ययथाविधिप्रभुं !
अरिवधकृतनिश्चयौद्रुतंतवबलमर्जुनकेशवौस्टतौ ॥ "

याप्रमाणें जीं आईबापें मुलांस सुनीति शिकवून त्या प्रमाणें त्यांजकडून वर्तणूक करवितात तींच धन्य होत. यांत त्यांचे लाड करणें चांगलें नाहीं, तसें करण्यांत, त्या उभयतांसही इहपर दुःखच आहे. या विषयीं हीं पुढील वचनें पहा

" लालनाद्बहवो दोषास्ताडनाद्बहवोगुणाः।
शिष्यस्त्रीतनयादीनामितियत्तन्मृषानहि ।
वैरिणीसाचविज्ञेया मातायालालयेत्सुतं ।
पितापिचयतःपुत्रोलालितोनरकंव्रजेत् ॥
आत्रिवर्षंसुतंमाताशिक्षयेच्चततःपिता ।
तथापि सहितोनित्यमागर्भजननाष्टमं ॥
अतऊर्ध्वंसदाचार्यैः शिक्षयेत्तंचकुत्रचित् ।
आषोडशंततःसर्वैनिवर्त्तेतहियौवने ॥
मातुःपितुश्चयःशिक्षानाचार्यस्यचनांधधीः ।
गृण्हीयायौवनेप्राप्ते सक्लेशंयातिदारुणं ॥
इहराजादिजाभीतिर्यमजापरजन्मनि " ।—

याचा अर्थ, गुरूनें शिष्याचे, भर्त्यानें स्त्रीचे व आईबापांनीं

मुलांचे लाड करणें, यांत फार दोष आहेत, व ताडनांत फार गुण आहेत. अशी जी नीति ती मिथ्या नाहीं. जी आई मुलांचे लाड करित्ये, ती त्याची वैरिणी होय. तसाच जो पिता लाड करतो तो नरकगति पावतो. मुलांचें तीन वर्षाचें वय होईपर्यंत त्यांस आईनें शिकवावें व पुढें बापानें शिकवावें, किंवा आठ वर्षाचें वय होईपर्यंत उभयतांनीं शिकवावें. या पुढें आचार्यानें ( गुरूनें ) शिकवावें, आणि त्यांचे सोळा वर्षांचें वय होऊन तीं तारुण्यांत येतांच, गुरु इत्यादिक सर्व त्यांस शिकवण्यापासून निवृत्त होतात. माता, पिता व गुरु यांची शिक्षा जीं अंध मुलें वगैरे घेत नाहींत, तीं तारुण्यांत भयंकर क्लेश पावतात. ते क्लेश असे कीं, येथें त्यांस राजदंडादि दुःखें सोसावीं लागून, जन्मांतरीं यमयातनाही भोगावी लागते.

अशा प्रकारेंकरून मुलांस तरबेज केल्यावर, मग निर्वाहास अवश्य असेल ती विद्या त्यांस शिकवावी. मध्यें शिकवूं नये. आज सोडमुंज आणि उद्यां लागलीच त्यांच्या हातांत इंग्रजी बूक हें तर सर्वथैव वाईट होय. दुसरें, क्रमाक्रमानें सर्व शिकविण्यांत त्यांजवर एकदम सर्व बोजा न पडतां त्यांची शक्तिही क्षीण होत नाहीं, नाहींतर मुलें निःशक्त होतात हें सर्वांनीं ध्यानांत ठेवावें.

---

## प्रकरण तिसरें.

### मुलगे व मुली यांचीं लग्नें.

श्रीमंत असो कीं दरिद्री असो, कोणत्याही मुलाचें निदान वीस वर्षांचें वय झाल्याशिवाय व मुलीचें निदान चौदा वर्षांचें वय

झाल्या शिवाय, त्यांचें लग्न त्यांच्या आईबापानीं करूं नये. याचें कारण, अल्पवयांत त्यांचीं लग्नें झाल्यानें एक तर त्यांचा विद्याभ्यास चांगला होत नाहीं, व दुसरें त्यांचे गुणावगुणही कळत नाहींत. शास्त्रांत लग्नकालाची जी यत्ता सांगितली आहे, ती जरी अधिक आहे, तरी वर लिहिलेली यत्ता प्रस्तुतच्या काळास बस आहे.

" त्रिंशद्वर्षःषोडशाद्वां भार्यांविंदेतनग्निकां

किंवा

" त्रिंशद्वर्षोद्वहेत्कन्यांहृद्यांद्वादशवार्षिकीं ।

" त्र्यष्टवर्षोष्टवर्षांवाधर्मेसीदतिसत्वरः ॥ "

पहिली स्मृति याज्ञवल्क्याची आहे. तींत त्यानें असें म्हटलें आहे कीं, जिला रजोदर्शन झालें नाहीं, अशा सोळा वर्षांच्या वयाच्या कन्येस, तीस वर्षांच्या पुरुषानें भार्यार्थ वरावें. दुसरी स्मृति मनूची आहे. तींत तो असें म्हणतो कीं, तीस वर्षांच्या वयाच्या पुरुषानें बारा वर्षांचें वयाची सुंदर कन्या वरावी, अथवा चोवीस वर्षांच्या पुरुषानें आठ वर्षांची कन्या भार्यार्थ वरावी. या दोन स्मृतींतील अर्थांतून तात्पर्य जर घेतलें, तर कन्येचा विवाह आठ वर्षांच्या आंत व सोळा वर्षांनंतर होणें अप्रशस्त आहे इतकें दिसून येतें.

परमेश्वरानें मनुष्य देह जो उत्पन्न केला आहे, तो विषय भोगार्थ केला नाहीं, मनुष्यमात्रानें आपणांस जाणून जन्ममरणप्रवाहांतून सुटावें अशा महत्कृत्यासाठीं केला आहे, यासाठीं मनुष्यदेहांत आलेल्या प्राण्यांनीं गृहस्थाश्रमासाठीं लग्न जें करणें तें एकवारच करावें, म्हणजे मैथुनार्थ नव्हे अशी, केवळ प्रजार्थ मात्र, त्यांनीं साऱ्या जन्मांत एकच स्त्री वरावी, त्याचप्रमाणें स्त्रीनेंही एकच पति वरावा. अर्थात् पुरुषास उपस्त्री ( रांड ) राखणें किंवा विधवेशीं विवाह करणें, तसाच स्त्रीस उपपति बाळगणें केवळ पशुधर्मच होय.

हा जो नियम, एकच स्त्री वरण्याविषयीं सांगितला, तो सामान्य लोकांविषयीं होय, विशेष लोकांविषयीं नव्हे. विशेष लोक म्हणजे राजा, जहागीरदार, इनामदार वगैरे खूप मोठ्या उत्पन्नाचे लोक समजावेत. या मोठ्या उत्पन्नदारांस एकच स्त्री वरणें प्रसंगविशेषीं भयकारक व हानिकारक आहे, कारण त्यांस त्या एका स्त्रीपासून पुत्रसंतति न झाल्यास त्यांच्या राज्यादिकांस अपायसंभावना आहे, म्हणून तसा प्रकार असतां, व योग्य वारस नसतां त्यांनीं तीन चार स्त्रियाही वरणें अवश्यक आहेत. ह्या स्त्रिया त्यांनीं वरणें त्या एकदम किंवा प्रथम स्त्री जिवंत आहे तोंच वरणें योग्य आहे. कारण, विधवेशीं जसा विवाह करणें पुरुषास अप्रशस्त आहे, तसाच स्त्रियांसही विधुराशीं विवाह अप्रशस्त आहे. सारांश विशेषलोक शिवाय करून सामान्य लोकांनीं टोलेजंग उत्पन्न नसतां, किंवा घरांत मोठी दौलत नसतां, अथवा थोडीबहुत दौलत व उत्पन्न असून पहिल्या बायकोचे मुलगे असतां, ती मेल्या कारणानें, किंवा जिवंत असून नावडती झाल्यामुळें, पुनः लग्न करून देशांत निष्कारण प्रजा वाढवून धान्य महाग करणें, तसेंच घरांत तंट्याचें मूळ करून ठेवणें, अगदीं अशास्त्र व वेडेपणाचें कृत्य होय.

असो; मनु व याज्ञवल्क्य यांच्या वचनाप्रमाणें, बारा वर्षें किंवा सोळा वर्षें मुलीच्या वयास झालीं असतां तिचें लग्न करावें तर मुलीस आलीकडे रजोदर्शन अकराव्या किंवा बाराव्या वर्षीं प्राप्त होतें; बरें आठ वर्षांचा काल प्रशस्त मानून करावें तर, त्याचा परिणाम भलताच झाल्यास म्हणजे तिचा पति गत झाल्यास तिकडूनही अडचण येते. यासाठीं असें न होण्यास उपाय एवढाच दिसतो कीं, मुलीच्या वयास पुरीं आठ वर्षें होऊन नववें लागल्यावर, आईबापांनीं उत्तम कुलशीलवान व स्वजातीच्या चौदा किंवा पंधरा वर्षांच्या अशा वराशीं तिचा वाग्निश्चय करून ठेवून, पुढें पांच किंवा सहा वर्षांनीं तिचा त्या वराशीं विवाह

करावा. हल्लीं वाग्निश्चय झाला कीं लागलीच लग्न, असा जो प्रचार चालला आहे त्यांत फार हानि आहे.

आतां वाग्निश्चय करून ठेवला आणि जरी कदाचित् तिला ऋतु प्राप्त झाला, तरी मग चिंता नाहीं, येविषयीं मनूचें ह्मणणें असें आहे कीं, *मुलीला गुणहीन* पतीस देऊं नये, मग तिला बापाच्या घरीं रजोदर्जन झालें तरी पत्करलें, ती खुशाल बापाच्या घरीं तशीच राहो. मुलगी गुणाहिनास देणें म्हणजे वयानें वृद्ध, अक्षरशत्रु, स्त्री मरण पावलेला असा विधुर, एक स्त्री जिवंत असतां तिचा द्वेष करणारा, व उपस्त्री बाळगणारा, इत्यादिक समजावेत. तात्पर्य, वाग्निश्चय झाला नसून जर मुलीस रजोदर्शन झालेलें बाधक होत नाहीं, तर वाग्निश्चय झाला असून तें कसें बाधक होईल? होणार नाहीं. कारण त्यास आपस्तंवस्मृत्याधारें प्रायश्चित असून तद्वारा कन्येची शुद्धि सांगितली आहे. विवाहापूर्वी बापाच्या घरीं रजोदर्शन झालेलें अबाधक याविषयीं मनूचें वचन आहे तें असें:—

"काममारणात्तिष्टेत्गृहेकन्यर्तुमत्यपि ।
"नचैवैनांप्रयच्छेतु गुणहीनायकर्हिचित् ॥"

वाग्निश्चय करून ठेवून लग्नकाल लांबवण्यांत जो लाभ आहे तो फार मोठा आहे. म्हणजे असा कीं, त्या अवकाशांत तो वर हरवला, मरण पावला, संन्यासी झाला, नपुंसक निघाला किंवा बाटला, वगैरे प्रकार झाल्यास वधूस दुसरा वर पाहण्यांत सवड राहते, व हेच प्रकार किंवा अन्य, वधूस झाल्यास वरासही सवड राहाते.

"नष्टेमृतेप्रव्रजतेक्लीबेचपतितेपतौ"
"पंचापत्सुचनारीणांपतिरन्योविधीयते ।"

वरती जो प्रकार सांगितला, तशा ठिकाणीं सदरील स्मृतीचीं योजना करणें योग्य असतां, ती सर्व एका बाजूस ठेऊन ज्या आलीकडील कित्येक पंडितांनीं कामाच्या स्वाधीन होऊन भलत्या-

च ठिकाणीं त्याची केलेली योजना नरदेहास अयोग्य आहे.

अस्तु. लग्नापूर्वी सहा सात वर्षें वाग्निश्चय करून ठेवण्यांत दुसरा एक लाभ असा आहे कीं, मध्यें पुष्कळ अवकाश सांपड-ल्यानें मुलीचे बारीक सारीक गुणावगुण वरास व त्याच्या आ-ईबाप वगैरे सुहृदांस सावकाशपणानें पाहण्यास सांपडतात, त्या योगानें त्यांचा विवाह उभय कुटुंबांसही सुखकर होतो. आ-लीकडे अशी चमत्कारिक तऱ्हा झाली आहे कीं, आईबापांनीं आपली मुलगी एकाद्याच्या मुलास लग्न लावून देण्याचा मात्र अ-वकाश, आणि एकदां लग्न होऊन गेलें कीं दोघा व्याह्यांचीं तोंडें दोन दिशांस झालींच! काय बरें हें ? लग्न झाल्यावर त्यांचें प्रेम अधिक व्हावें कीं उणें ? परंतु अधिक प्रेम न वाढतां, वर किंवा त्याचीं आईबापें, तशाच त्याच्या बहिणी वगैरे, ज्या पूर्वीं आम-च्या बाळ्याचे किंवा भाऊरायाचे एकदां कसेतरी दोन हातांचे चार हात होवोत ह्मणून, याच्या पायां पड त्याच्या पायां पड, याला मध्य-स्थ घाल त्याला मध्यस्थ घाल, याला कांहीं देऊं कर त्याला कां-हीं देऊ कर, अशा प्रकारें दीनवाण्या होऊन आशाळभूतपणा करणाऱ्या, त्याच पुढें तिला पाण्यांत पाहूं लागतात; व तिला अनेक प्रकारचा जाच करूं लागतात. तो असा कीं, तिला स्वतः हाणमार करणें, तिच्या नवऱ्याकडून ह्मणजे आपल्या मुलाकडून करावेणें, तिच्यावर नाहीं नाहीं तीं खोटीं तुफानें घेऊन तिला डागणें, भाजणें, खाण्यापिण्याचे हाल करून पोटभर खाऊं न घा-लणें, तिच्या आईबापांस शिव्या देऊन तिलाही दुःसह अपशब्द बोलणें.—म्हणजे ती काळीच आहे, तिरळीच आहे, रांड मांगा-चीच औलाद आहे,—असें म्हणून अखेर तिला विहीर इत्यादिकांत ढकलून देऊन ठार मारणें, किंवा मुलीनेंच त्रासानें जीव देणें, इ-त्यादि प्रकार सांगावे तितके थोडेच आहेत. परंतु त्यांच्या मनांत असा विचार येत नाहीं कीं, आपल्या मुलीस जसें तिच्या सासूसास-ऱ्यांनीं नीट नांदवावें म्हणून आपणांस वाटतें, तसेंच हिच्याही आईबापांस वगैरे वाटतें. सारांश, आपल्या मुलींप्रमाणें सुनांस वा-

गविणाऱ्या सास्वा शंभरांत पांच* निघतील तर नकळे. यास्तव मुलीच्या आईबापांनीं, हे सर्व अनर्थ टाळण्यासाठीं मुलीचें लग्न सावकाशीनें करावें हें चांगलें होय. असाच प्रकार वराच्याही आईबापांनीं करणें चांगलें. नाहीं तर लग्न होऊन मुलगे वाईट निघाल्यानें आईबापांच्या गळ्यास निरर्थक फांस लागतो.

मुलीचा विक्रय करून तिच्या आईबापांनीं, पैसा घेणें, तसाच मुलाच्या आईबापांनीं हुंड्याची अट धरून तो मुलीच्या आईबापांपासून घेणें, हे दोनीही प्रकार सारखेच निंद्य आहेत. यासाठीं हे, तसेच रासन्हाणीं, पायघड्या, न्हाणवलीची रस्त्यांतून वाजत गाजत मिरवणूक, डोहळे जेवणाचा समारंभ, वगैरे प्रकार गुप्तपणाचे असतां ते प्रसिद्धीस आणणें अत्यंत लज्जास्पद असून, राजा इत्यादिकांचें तर फारच अहित करणारे आहेत; यास्तव यांचा प्रचार नाहींसाच झाला पाहिजे.

---

## प्रकरण चौथें.

### द्रव्य संपादन व त्याचा विनियोग.

हरएक मनुष्यानें द्रव्य मिळविणें तें न्यायानें मिळवावें; अन्यायानें कधींही मिळवूं नये. चोरी, चाहाडी, खोटी साक्ष, लांच व विश्वासघात, इत्यादि प्रकारानें मिळविलेलें द्रव्य अन्यायानें होय. याशिवाय मिळविलेलें न्यायाचें असून, त्याचा विनियोग पांच प्रकारांनीं करण्याची आज्ञा शास्त्रानें केलेली आहे. म्हणजे एक भाग धर्माकडे, एक भाग कीर्तिकडे, एक भाग संग्रहाकडे, एक भाग स्वतः आपल्याकडे, व एक भाग मातापिता, स्त्रीपुत्र, व आप्त सुहृद यांकडे. याविषयीं आज्ञावचन आहे तें खालीं लिहिलें आहे.

---

* सास्वा जशा शेंकडा पंचाण्णव वाईट, तशाच सुनाही वाईट आढळतात. परंतु त्यांची संख्या उणीच असल्याचें प्रायः अढळून येतें.

" धर्माययशसेऽर्थायआत्मनेस्वजनायच "
" पंचधाविभजन्वितमिहामुत्रचमोदते "

धर्म म्हणजे सत्पात्रीं दान तो. यामध्यें इष्ट आणि पूर्त्त असे दोन भाग असून, त्यांत इष्टामध्यें तीन भाग आहेत ते असेः—१केवळ श्रोत्रिय, २ केवळ ब्रह्मनिठ, आणि ३ श्रोत्रिय, ब्रम्हनिष्ठ.

१. इष्टाचे भागांचा तपशीलः—

१. केवळ श्रोत्रियभागांत १ यज्ञयाग, २ श्रौत व स्मार्ताग्नि, ३ वेदशास्त्रांच्या शाळा, व ४ कुलगुरु ( उपाध्याय ) अशीं चार प्रकरणें समजावींत.

२. केवळ ब्रम्हनिष्ठ भागांत १ शिव विष्णु आदिकरून देवांचा सत्कार म्हणजे पूजा, नैवेद्य वगैरे व्यवस्था, आणि २ जगद्गुरूचा सत्कार, अशीं दोन प्रकरणें समजावीं.

३. श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ भागांत, आपणास मोक्षप्राप्ति करून देणारा आपला ज्ञानदाता सद्गुरु मात्र समजावा.

१ पूर्त भागांचा तपशीलः—

१. पूर्त भागांत १ देवालयांचे जीर्णोद्धार, २ वापी तडागादिक कृत्यें, ३ धर्मार्थ म्हणजे जकात न घेतां रस्ते, पूल वगैरे कृत्यें आणि ४ सदावर्त व अन्नसत्र वगैरे.

यश म्हणजे कीर्ति अथवा लौकिक होय. त्याचा प्रकार असा आहे कीं, नट, नर्तक, गायक, आंधळे, पांगळे वगैरे रोगग्रस्त अनाथ, व्यावहारिक उपयुक्त ग्रंथ करणारे ग्रंथकार, तसेच कारागीर वगैरे, इत्यादिकांकडे जो द्रव्याचा विनियोग, त्याचें नांव यश असें समजावें. शहरसुधारणाप्रकरण तें यांतीलच कृत्य होय.

अर्थ म्हणजे संग्रह किंवा संचय होय. याचा प्रकार असा आहे कीं, आपत्कालीं किंवा प्रसंगविशेषीं आपणास उपयोगीं पडावा म्हणून जो द्रव्याचा भाग मागें टाकून ठेवणें तो.

आपणाकरितां म्हणजे केवळ स्वतःकडे जो द्रव्याचा विनियोग तो. याचा अर्थ असा कीं, आपल्या इतमामाप्रमाणें आपला वस्त्रपात्र भोजन इत्यादि खर्च, असें समजावें.

स्वजन म्हणजे माता, पिता, स्त्री, पुत्र, कन्या, आप्त, सुहृद, इष्टमित्र इत्यादिकांकडे खर्च तो.

हे जे वरती द्रव्याचे पांच भाग लिहिले, यांतील दोन भाग शिवाय करून, म्हणजे स्वतःचा भाग, व स्वजनाचा भाग आपला आपल्या जवळ ठेवून, राहिलेले तीन भाग म्हणजे धर्माचा, यशाचा व संचयाचा, आपणास योग्य व्ययाचें परिज्ञान नसतां, तसेंच संरक्षण करण्याचे सामर्थ्य नसतां, ते कोठे ठेवावेत म्हणजे ते सुरक्षित रहातील, व त्यांचा योग्य व्यय होईल, किंवा प्रसंगीं आपणास उपयोगी पडतील तें पुढें सांगण्यांत येईल.

---

## प्रकरण पांचवे.

### तटस्थ लोकांविषयीं.

**तटस्थ**—लोक दोन प्रकारचे आहेत; ह्मणजे एक आस्तिक तटस्थ व दुसरे नास्तिक तटस्थ. तटस्थ या शद्बाचा अर्थ असा कीं, ज्यांची बुद्धि वेदप्रतिपाद्य सनातन धर्माविषयीं स्तब्ध ते. या प्रत्येकाचीं लक्षणें खालीं लिहिल्याप्रमाणें समजावीं:—

१. जे लोक वेदश्रुतींस मानितात, परंतु त्यांतील त्रिकांडापैकीं पूर्वांगरूप कर्म किंवा उपासना कांड यांतच मात्र परम पुरुषार्थ आहे असें समजून व्यासस्थापित ह्मणजे जगद्गुरु श्रीमच्छंकराचार्यस्थापित उत्तरांगरूप ज्ञानकांड मानीत नाहींत, असे जे केवळ द्वैतवादी लोक ते आस्तिक तटस्थ होत.

२. जे लोक वेदश्रुतींस मुळींच मानीत नाहींत, ह्मणजे वेदोक्त ज्ञानकांड मानीत नाहींत इतकेंच नव्हे तर वेदोक्त कर्मकांड व उपानाकांड यांसही मानीत नाहींत, ह्मणून

अशा प्रकारचे जेवढे लोक तेवढे सर्व नास्तिक तटस्थ होत.

“ वेदप्रमाणकानींहप्रोचुर्येदर्शनानिषट् ।
न्यायवैशेषिकादीनिस्मृतास्तेआस्तिकाभिधाः ॥
अवैदिकप्रमाणानांसिद्धांतानांप्रदर्शकाः ।
चार्वाकाद्याःषड्विधास्तेरव्यातालोकेपुनास्तिकाः ॥ ”

या वरील श्लोकांतील अभिप्राय असा आहे कीं, वेदाचें प्रमाण धरून जीं बोलतात, तीं सहा आस्तिक दर्शनें होत. त्यांचीं नांवें,— गौतम आणि कणाद यांचीं न्यायदर्शनें दोन, कपिल महामुनी व पतंजलि यांचीं सांख्य दर्शनें दोन; यांतून पहिल्यास प्रकृति प्रधान मानण्यानें निरीश्वर सांख्य ह्मणतात आणि दुसऱ्यास योग किंवा सेश्वर सांख्य ह्मणतात, आणि जैमिनि व बादरायण यांचीं मीमांसा दर्शनें दोन. आतां जीं वेदाचें प्रमाण मुळींच न घेतां मनःकल्पित सिद्धांतप्रतिपादन करणारीं तीं सहा नास्तिक दर्शनें होत. तीं चार्वाक बौद्धादिकांचीं मतें प्रसिद्धच आहेत.

मध्व वल्लभादिकांची गणना आस्तिक तटस्थांत आहे, व ब्रह्म समाजादिक मतस्थापकांची गणना वरील श्लोकांच्या अभिप्रायावरून नास्तिक* तटस्थांत आहे. याशिवाय चार मठांच्या बाहेर असणारे जेवढे लोक, तेवढे यच्चयावत सर्व नास्तिक तटस्थ असल्याचें सांगणेंच नको.

नास्तिक तटस्थ मतें ईश्वरप्राप्तीस निरुपयोगी हें तर आहेच परंतु आस्तिक मतांत सर्व श्रेष्ठ जें व्यास किंवा शांकरशुद्धाद्वैतमत, त्यांत आणि इतर आस्तिकांत ह्मणजे आस्तिक तटस्थांत किती अंतर आहे, त्याविषयीं ह खालीं प्राकृत वाक्य एका भगवद्भक्ताचें दिलें आहे, त्यांतील अर्थ करण्यावरून ध्यानांत येईल.

“सार विचार करीं। अरे मना सार विचार करीं”
“सारवी च्यार करीं। अरे मना, सारवी च्यारकरीं”

---

* ब्रह्मसमाजादिक पंथस्थापक हे ईश्वर आहे असें मानीत असतां, ते नास्तिक कसे? त्यास असें समजावें कीं, बौद्धादिक हेही ईश्वर आहे ह्मणून मानितात, परंतु वेद प्रतिपाद्य ईश्वर मानीत नसल्यामुळें जसे ते नास्तिक ह्मटले जातात, तसेच हेही ह्मटले जातात.

यद्वा

" सार विचार करी । अरे मना सार विचार करी "

ह्या वरील तीन प्रकारांत पहिल्याचा सरळ अर्थ म्हणजे कवीचा वास्तविक हृद्गताभिप्राय असा आहे कीं, हे मना, या जगांत जें सार वस्तु आहे त्याचा तूं विचार कर, तोच अर्थ दुसऱ्या व तिसऱ्या प्रकारांत अनुक्रमानें असा झाला आहे कीं, पहिल्याशीं व याशीं अगदींच मेळ नाहीं, दुसऱ्या प्रकाराचा अर्थ असा कीं, हे मना, भक्ताचें घर भगवान् हा आपल्या चार हातांनीं सारवितो असा झाला आहे, आणि तिसऱ्या प्रकारांत सार ( चिंच इत्यादिकांचें कालवण ) तें विचार करतें असा झाला आहे. हे अर्थ मूळच्या अक्षरांत मनःकल्पित फेरबदल केल्यानें पहिल्याशीं विरुद्ध झाले आहेत, आणि त्यामुळें कवीचा मनोभिप्राय एका बाजूस राहून जाऊन जसा अन्यथा अर्थ झाला आहे, त्याचप्रमाणें—तत्वमसि—या श्रुतीचा अर्थ, तें ब्रह्म तूं आहेस असा सरळ असतां,—अतत्वमासि अशी त्या श्रुतिवचनास कपोलकल्पित विकृति केल्यानें, तें ब्रह्म तूं नाहींस, असा झालेलाही श्रुत्यभिप्रायाविरुद्ध अन्यथा झाला आहे. म्हणून श्रुत्यनुकूल जें शांकरभाष्य, त्याशीं माध्वादिकांचीं भाष्यें विरुद्ध असल्यामुळें, परमेश्वरप्राप्तीस निरुपयोगीच होत. या कारणास्तव विचारवंत मुमुक्षूंनीं, या मतांसही कधीं विश्वासूं नये. आतां नास्तिक तटस्थ व आस्तिक तटस्थ, यांच्या बुद्धींत श्रुतिविरुद्ध व्यामोह कां उत्पन्न होतो, त्याचें कारण मनूनें व व्यासानें सांगितलें आहे तें असें आहे:—

" अनार्यतानिष्ठुरताक्रूरतानिष्क्रियात्मता ॥
पुरुषंव्यंजयंतीहलोकेकलुषयोनिजं ॥ १ ॥
निषेकंविपरितंसआचष्टेवृत्तचेष्टया ॥
मयूरइवकौपीनंनृत्यंसंदर्शयन्निव ॥ २ ॥

मराठी ... ठाणे.

" राक्षसाःकलिमाश्रित्यजायंतेब्रम्हयोनिषु ॥
हरिभक्तिमिषेणापिहंतिधर्मान्सनातनान् ॥

मनूच्या श्लोकांतील भाव असा आहे कीं, नीचत्व, निष्ठुरत्व, क्रूरत्व, आणि क्रियाहीनत्व, हीं पुरुषांच्या ठायीं असणारीं चिन्हें, तो अशुद्ध योनींत उत्पन्न झाला असल्याचीं दर्शक समजावींत. हाच अर्थ भारतामधील व्यासाच्याही वचनांत आहे. त्यांत विशेष दृष्टांत देऊन इतकेंच सांगितलें आहे कीं,जो पुरुष विपरीत निषेकोत्पन्न म्हणजे परवीर्योत्पन्न आहे, तो त्याच्या आचरणावरूनच आपलें नीचत्वादिक लोकांच्या दृष्टीस आणतो. जसा मोर हा, आपल्या नाचण्यानें लोकांच्या दृष्टोत्पत्तीस आपलें गुह्य आणितो त्याप्रमाणें. तिसरा श्लोक बृहन्नारदीमधील आहे. त्यांत अर्थ असा आहे कीं, राक्षस हे कलियुगाच्या आश्रयानें ब्रम्हयोनींत उत्पन्न होतात व हरिभक्तीच्या निमित्तानें [ ईश्वर भक्तीच्या मिषानें ] सनातन धर्माचा नाश करितात. यांत नास्तिक तटस्थांकडे पहिले दोन श्लोक व आस्तिक तटस्थांकडे तिसरा श्लोक जरी लागेल असें प्रथम वाटतें, तरी तसें लावणें नीट होणार नाहीं; कारण, तशानें कित्येक कुलीन व पतिव्रतांस व्यर्थ दोष लागेल. यास्तव, असें करावें कीं, ज्या माऊलीच्या पोटीं असलें गारगोटीच्या रूपाचें रत्न उत्पन्न झालें असेल, मग तें नास्तिक तटस्थ असो कीं आस्तिक तटस्थ असो, राक्षसांश आहे असं स्पष्ट समजत जावें.

एकंदरींत असें समजावें कीं, ज्ञानकांडाविषयीं स्वतः दोषदृष्टि करणारा, दुसऱ्यास तसाच उपदेश करणारा, मद्यादिक दुष्ट पदार्थांचें सेवन करणारा, मिथ्या भाषण करणारा, व्यभिचार अथवा विधवेशीं विवाह करणारा, आस्तिक व नास्तिक तटस्थांस हरएक प्रकारें आश्रय देणारा, तसाच त्यांच्या मतास अवलंबून त्यांस गुरुत्वेंकरून मानणारा, वेदोक्त नव्हे असा मनःकल्पित अतिशय आचार किंवा अनाचार करणारा, वेदशास्त्रविरुद्ध

भलत्याच वेळेस निजणारा, व भलत्याच वेळेस भोजन करणार वेदोक्त कर्मोपासना सोडून भलत्याच प्रकारें चालणारा, इत्यादि प्रकारें वागणारा पुरुष परमेश्वरप्राप्तीस अनधिकारी समजावा, आणि या सर्व दोषांनीं विवर्जित, तो अधिकारी समजावा. तात्पर्य, या भागांतील प्रथम प्रकरणापासून या पांचव्या प्रकरणापावेतों, जशी वागणूक सांगितली आहे तीप्रमाणें जो प्रपंच करील, तोच साधनचतुष्टय संपन्न होऊन परमार्थ करण्यास योग्य होईल. आतां हा प्रकार एका व्यक्तीचा झाला तोच, सार्वत्रिक होण्यास उपाय पुढील भागांत पहा.

---

( सार्वजनिक भाग. )

## प्रकरण १.

### सार्वत्रिक आरंभ कोठून व्हावा याविषयीं.

अशा प्रकारें करून सशास्त्र प्रपंच करून परमार्थ साधणारे लोक हिंदुस्थानांत किती आहेत याचा विचार पाहूं गेल्यास त्यांची संख्या फारच थोडी निघेल. म्हणजे अशी कीं, आज या हिंदुस्थानांत एकंदर प्रजा सुमारें २२ कोटी आहे. त्यांत कांहीं अस्तिक व कांहीं येथले व कांहीं बाहेरून येथें येऊन राहिलेले दरोबस्त नास्तिक, मिळून ११ कोटी प्रजा धरिल्यास निवळ ११ कोटि प्रजा शांकरमताची आहे. परंतु यामध्येंही आपण स्मार्त, भागवत, रामदासी किंवा वारकरी वगैरे आहों, इतकेंच, जाणणारे बहुतेक लोक असल्यामुळें, आपल्या मुळाचें ज्ञान असलेले फार तर ११ लक्ष लोक निघतील, आणि त्यावरून असा मनुष्य शेंकडा एक असेल यांत संशय नाहीं, परंतु एवढ्यांच्यानें इतके लोकांस, तशांतून ठिकठिकाणीं फांकलेल्यांस आळ्यांत आणणें आजच्या काळीं मोठें दुर्घट आहे. कारण, आजच्या प्रसंगीं प्रत्येक मनुष्य, परधर्मी राजाच्या सहवासानें स्वतंत्रपणं वागूं लागला असल्यामुळें, कोणी कोणाच्या कह्यांत नाहीं.

कोणी ह्मणेल कीं, पूर्वी तरी ही गोष्ट होण्यास सुघट असा काळ कधीं होता? त्यास असें समजावें कीं, ज्या वेळेस छत्रपति शिवाजी महाराज व त्यांचे गुरु समर्थ रामदासस्वामी त्याचप्रमाणें पेशव्यांच्या कारकीर्दींत थोरले माधवरावसाहेब व त्यांचे मंत्री रामशास्त्री होते, त्या वेळेस लोकांत धर्माभिमान, शिवाय राजसत्ते ची पुष्टी असल्यानें सहजींच लोक आळयांत आणण्यास उत्तम काळ होता. ह्मणजे जर ते लोक तेव्हांच मनावर घेते व श्री-मच्छंकराचार्यांस विनंतिपत्र लिहून त्यांजकडून एकेक धर्माध्यक्ष मागून घेऊन राज्यांत स्थापिते, तसेंच धर्मसंबंधीं हरएक प्रकरणांत त्या धर्माध्यक्षांच्या आज्ञेबाहेर बिलकुल कोणी वागतां कामास नये असें ठरविते, तर आज जी बलबलपुरी माजली आहे ती कधींच न माजती. बरें, एतें स्वराज्य झालें आहे, हें शंकराचार्यांनीं तरी मनांत आणून पुण्यास येऊन प्रयत्न करायाचा होता, पण त्यांजकडूनही तो झाला नाहीं, त्यामुळें आज या गोष्टीचा मोठाच विचार येऊन पडला आहे. वस्तुतः पाहिलें असतां शह-रोशहरीं व मोठमोठ्या गांवीं गोसावी, जंगम वगैरेंचे मठ अ-सावेत, त्यांस उत्पन्नें असावींत आणि शंकराचार्यांचें तेथें कांहीं नसावें हें उभयतांसही दूषण खरेंच, पण आतां हा खेद करून कांहींच उपयोग नाहीं.

तर मग आतां या गोष्टीस कांहीं उपाय आहे कीं नाहीं असें कोणी विचारील, त्यास असें उत्तर आहे कीं, आजूनही यास उपाय आहे. तो हा कीं, शिंदे, होळकर, गायकवाड, व ज-यपूर इत्यादि उत्तर हिंदुस्थानांतील वैदिक धर्माचीं सरकारें, तसेंच प्रतिनिधी, सचीव, सांगलीकर, मिरजकर, कुरुंदवाडकर, जमखिंडीकर, रामदुर्गकर, तंजावरकर, म्हैसुरकर, आ-णि सांवतवाडीकर इत्यादि दक्षिण हिंदुस्थानांतील सरका-रें, यांनीं प्रथम आपापल्या राज्यांत शंकराचार्यांचे धर्मा-ध्यक्ष आणून स्थापून, धर्मप्रकरणीं व्यवस्था त्यांच्या हातून चाल-विण्याचा पाया घातला पाहिजे. म्हणजे तें वळण घेऊन इत-

र ठिकाणचे लोक लागतील व त्या योगानें सर्वत्र हळू हळू आळा होऊं लागेल. तात्पर्य, वर लिहिलेल्या सरकारांनीं मनावर घेऊन हें काम प्रथम हातांत घेतल्याशिवाय होणार नाहीं, कारण कोणतेंही जुनाट परंतु माजी पडलेलें महत्कार्य, पुनः चालू करण्यास करणाराच्या अंगीं सत्ता असावी लागते, ती सदरींच्या सरकारांस आहे. अशी सत्ता आज त्यांस असून जर ह्या लेखास यावेळीं त्यांनीं अमान्य केलें, तर हा देश बुडाल्याच्या दोषापासून आम्ही मुक्त झालों यांत अगदीं संशय नाहीं, कारण सुविचार सुचाविण्याचें जें कर्तव्य तें आम्हीं केलें.

---

सार्वजानिकभाग.

## प्रकरण २.

### सार्वजनिक वैदिक धर्म सभा-

ह्या सभेची रचना अशी करावी कीं, प्रथमतः प्रत्येक सरकारानें, आपआपल्या राज्यांतील सर्व जातींमधील थोर थोर व संभावित लोकांस बोलावणें करून, सर्वांस मोठ्या अगत्यानें असें कळवावें कीं, आपण स्मार्त; भागवत वगैरे सर्व वैदिक धर्माचे लोक, श्री वेदव्यास ह्मणजे श्रीमच्छंकाराचार्य स्वामी यांचे मूळापासून अनुयायी आहोंत. असें असतां आपणाकडून त्यांचा सन्मान राखण्यास व त्यांची धर्मसत्ता वृद्धिंगत करण्यास आज पावेतों हयगय झाली, ही गोष्ट मोठी शोचनीय झाली. आतां झालेल्या गोष्टीस उपाय नाहीं, परंतु येथून पुढें सर्वांनीं या महत्कृत्यास झटावें हें त्यांचें कर्तव्य आहे असें जाणून, आम्ही तुह्मा सर्वांस आज बोलावणें केलें आहे, व जगद्गुरूंकडे धर्माध्यक्षाची स्थापना आपल्या सर्व प्रांताकरितां आपल्या ह्या शहरांत होण्यासाठीं विनंतीपत्र लिहिणें आहे, तर या सत्कृत्यास सर्वांनीं अनु-

मोदन दिलें पाहिजे. नंतर सर्वांनीं तथास्तु म्हणून अनुमोदन दि-
ल्यावर विनंतीपत्र लिहावें तें असें:—

"श्री स्वामि चरणारविंदीं विनंति ऐसीजे, जगद्गु-
रूचा अवतार पूर्वी वैदिक धर्म स्थापनार्थ होऊन
त्यानीं त्याची चहूं दिशांस चार मठांच्या रूपानें
स्थापना केली व आपणांस त्याचे संरक्षण करण्या-
करितां परंपरेनें नेमिलें. तें काम आपण चालवीत
असतां, मध्यंतरी अनेक नास्तिक राजांनीं इकडील
राजांची सत्ता बळकाविल्यानें आपणास मोठा प्रति-
बंध झाला. त्या योगानें आपण उदास होऊन स्व-
स्थ राहिलां व आह्मीही बेबंद झालों, हीच स्थिति
आणखी कांहीं काळ राहिल्यास एकंदर या देशा-
चा परिणाम नीट होणार नाहीं. हें आपल्या मनांत
वागत असेलच व तें वागलेंही पाहिजे. परंतु आ-
ह्मास आमचा परिणाम दिसून आल्या शिंवाय व
आह्मी सर्व भावें आपणांस पुढारी व पूज्य मानि-
ल्या शिवाय आपण तरी काय करणार? तें आम्हा-
कडून आज पावेंतों न झाल्यानें आमची स्थिति फा-
र वाईट झाली, हें आम्हास प्रस्तुत बरेंच समजूं
लागल्यानें खेद होतो. यास्तव हल्लीं आम्ही स-
र्वांनीं अमुक सरकारच्या आश्रयानें हें विनंतीपत्र
सर्वांच्या सह्यानिशीं चरणीं सादर केलें आहे, तर
स्वामींनीं कृपा करून व आपल्या कर्तव्यावर दृष्टि
देऊन, एक निस्पृह, निःपक्षपाती, निर्लोभी, निर्म-
त्सरी, सदाचार संपन्न, व उत्तम धर्मतत्ववेत्ता विद्वा-
न असा अमुक धर्माध्यक्ष आह्मास नेमण्याचें आज्ञा-
पत्र येऊन त्याच्या नांवची सन्मानसूचक सनदही कृपा
करून पाठविण्याची आज्ञा व्हावी.

या प्रमाणें विनंतिपत्र गेल्यावर तिकडून आज्ञापत्र व सनद ये-

तांच धर्माध्यक्षास त्या अधिकारावर सर्व लोकांनीं महोत्साहपूर्वक स्थापावें व सर्वांनीं धर्म प्रकरणी हरएक गोष्टींत त्याची आज्ञापाळून त्यांचे आज्ञे बाहेर अगदीं कोणी वागूं नये.

पुढें धर्माध्यक्षानें राजाच्या वगैरे माहितीनें व सल्लयानें, एकेका जातीचा पूर्ण माहितगार, प्रामाणिक व त्या त्या जातीस पसंत, असा एकेक प्रतिनिधी व त्यास एकेक तसाच हस्तक लोकांकडून सभेकरितां निवडून काढून आपल्या हाताखालीं घ्यावा, आणि धर्माध्यक्ष राजा व हस्तकांसाहित सर्व प्रतिनिधी मिळून जो समुदाय त्यास धर्म सभा असें नांव द्यावें.

राज्यांतील अथवा प्रांतांतील जो धर्माध्यक्ष तो त्यांतील लहान मोठ्या सर्व ठिकाणचा धर्माध्यक्ष समजावा. ह्मणून ठिकठिकाणचेही प्रतिनिधी व हस्तक सभेंत असणें अवश्यक आहेत. या सर्व प्रतिनिधींस व हस्तकांस, त्यांच्या निर्वाहास पुरेल असें वेतन असावें, आणि तें त्यानां धर्माध्यक्षाकडून अंगदीं बरोबर वेळच्या वेळीं पावत जावें.

प्रतिनिधी व हस्तक यांचें काम असें आहे कीं, त्यानीं नेहेमीं धर्माध्यक्षाच्या मठांत हजर असावें, लोकांस सुनीतीची शिकवण देऊन त्याप्रमाणें त्यांजकडून वर्तणूक करवावी, धर्म विरुद्ध कोणी वागेल व ऐकणार नाहीं, तर ती गोष्ट धर्माध्यक्षास कळवावी, परंतु खोटी गोष्ट मात्र बिलकूल सांगूं नये, तशीच अधर्म झाला असतां लांच वगैरे खाऊन त्याची छपवाछपव[१] करूं नये, आपापल्या लोकांकडून जें उत्पन्न येईल त्याचा जमाखर्च राखावा व आलेलें द्रव्य धर्माध्यक्षाच्या स्वाधीन करून त्याबद्दल पावती घेत जावी. इत्यादि.

धर्माध्यक्षानें, प्रतिनिधी व त्यांचे हस्तक यांस ठरलेलें वेतन द्यावयाचें तें लोकांकडून येणाऱ्या द्रव्यांतून द्यावें, हा लोकांक-

१ अधर्माची छपवाछपव करणारा व लांच वगैरे खाणारा कामावरून तत्काळ दूर केला जाईल अगर दंडास पात्र होईल.

हून येणारा पैसा, सर्वांनीं काय प्रमाणानें द्यावा व धर्माध्यक्षानें घ्यावा, त्याचा नियम असा आहे कीं, हरएक मनुष्यानें आपणास जी वार्षिक प्राप्ति असेल, तिचा चौथ्या प्रकरणांत लिहिल्याप्रमाणें ६० वा भाग निदान ६४ वा भाग अवंचकपणानें द्यावा. चौसष्टावा भाग म्हणजे रुपयामागें पाव आणा द्यावा. देण्यास कोणीही मागें पुढें करूं नये. कारण, हा भाग म्हणजे फार मोठा आहे असें नाहीं. धर्मभागांत काटकसर करण्यापेक्षां पाहिजे असेल तर यशाच्या भागांत काटकसर करावी, परंतु ती यांत करूं नये. •याविषयीं धर्म तेथें जय असतो हें पक्केपणें स्मरणांत धरावें.

राजे इत्यादिकांच्या स्त्रियांस जीं राजादिकांकडून उत्पन्नें असतात, त्यांस निराळा भाग जगद्गुरूंकडे जरी देणें नको, तरी त्यांस स्वतःचा धर्म घडावा अशी इच्छा असल्यास, त्यांनींही वरील नियमाप्रमाणेंच वागावें.

लोकांकडून आलेल्या पैशाची धर्माध्यक्षानें व्यवस्था करावी ती अशीः—जें एकंदर उत्पन्न होईल त्यांतून शेकडा १० रुपये जगद्गुरु शंकराचार्यांकडे द्यावे, शेंकडा १० वेदशास्त्राध्ययनाच्या शाळांचा खर्च निभविण्याकडे, शेंकडा १० आपलें वेतन घ्यावें, शेंकडा ६० मध्यें हस्तकांसहित लोकांनीं दिलेले प्रतिनिधि, आपला चिटणीस व कारकून वगैरे, खजिनदार व त्याचे कारकून वगैरे, खजिना संरक्षण करणारे व इतर कामाचे शिपाई वगैरे, आणि सादिलवार वगैरे इतकीं प्रकरणें भागवावीं, आणि शेंकडा १० रुपये विशेष कार्यें वगैरे करितां राखून ठेवावे.

ज्या ठिकाणीं रामानुज, मध्व, वल्लभ, व बसवस्वामि, यांच्या संप्रदायिकांचा बराच मोठा भरणा असेल, तेथें राखून ठेवलेल्या शेंकडा १० रुपयांपैकीं शेंकडा ५ रुपये काढून त्याचे तारतम्यानें चार, तीन, दोन, किंवा एक भाग करून, हिशेबानें त्या त्या स्वामीस द्यावे.

पैसा देणारांचें धर्माध्यक्षानें राजवर्ग आणि प्रजावर्ग असे

दोन वर्ग करून, त्या त्या वर्गांत तीं तीं नांवें नोंदून आपल्या तफ्तरीं ठेवावीं. प्रजावर्गांत साठावा व चौसष्टावा भाग देणारे असल्यास त्यांचे दोन वर्ग निरनिराळे नोंदवावे. त्याचप्रमाणें प्रजावर्गांत ज्यांस ठळक उत्पन्न नाहीं, व ज्यांच्या पोटगी खर्चावरून त्या मानानें भाग घ्यावा लागतो, त्यांचीं नांवें तिसऱ्या प्रतींत दाखल करवींवींत. ह्मणजे त्यांचीं नोंद जो ज्या लोकांचा प्रतिनिधि असेल त्यानें आपापल्या वहींत ठेवावी.

धर्माध्यक्षाचें काम असें आहे कीं, त्यानें आपल्या हाताखालचे लोकांस ह्मणजे मुख्यत्वेंकरून प्रतिनिधींस व त्यांच्या हस्तकांस धर्म प्रकरणांत कोणी कसें वागावें त्यांची सांजसकाळ शिकवण द्यावी, व ती प्रमाणें त्यानीं लोकांस समज देऊन त्यांस तसें वागण्याचें वळण लावावें. आलेल्या पैशांतून मुख्य मठाकडे पैसा रवाना करावा. कोणा अपराध्यास शिक्षा देणें ती सभेच्या संमतानें ठरेल त्याप्रमाणें द्यावी. हरएक मत घेतांना हरएकाचें लेखी मत घेत जावें व त्यांत मतभेद असल्यास, प्रबल पक्ष ग्रहण करून काम चालवावें. शिवाय वर्षांतून प्रांतांत एक वेळ फेरीही करीत जावी.

आणखी धर्माध्यक्षानें असं करावें कीं, ज्या ज्या जातींत जे जे लोक अंधपरंपरेनें न कळून डोले करीत असतील, त्या संबंधानें गळ्यांतून नाडे, सैल्या वगैरे घालीत असतील; पीरास व दावलमलिखास भजत असतील, लटके आंगारे, धुपारे, गंडे व पेट्यांनीं लोकांस भोंदीत असतील, तसेंच जे भोंदून घेत असतील, यवनादिक नीचांस गुरुत्व कल्पून त्यांस भजत असतील ज्यामध्यें उपासनेचें बालाग्रही नाहीं अशा खोट्या ब्रह्मसमाजादिक पंथांच्या नादीं लागले असतील, पाद्री वगैरे नास्तिकांचे तसेच भणिमंजर्यादिक कपोल कल्पित ग्रंथ करणाऱ्या वैष्णवाचे नादीं असतील, इत्यादिकांस त्यांच्या त्यांच्या प्रतिनिधीकडून मागील भागांत सांगितलेल्या गोष्टींचा बोध करवून, वाईट गोष्टी त्यांनीं सोडाव्या असा यत्न करविण्यास झटलें पाहिजे. इतक्यावर

ह्या सामोपचारानें न ऐकतील त्यांस, सर्व संमतानें कडक शिक्षा देऊन मार्गावर आणिलें पाहिजे.

आणखी धर्माध्यक्षानें असें सर्वांस कळविलें पाहिजे कीं, मुख्य जीं साहा आस्तिक दर्शनें आहेत त्यांत उत्तर मीमांसा दर्शन हें सर्व श्रेष्ट ठरलेलें असल्यामुळें, त्यांत सुधारणा होण्याचें बिलकूल राहिलेलें नाहीं. या साठीं धर्मसुधारणा करण्याचे कामीं आतां कोणीं न पडतां, व नवे नवे पंथ न कढतां, श्रीवेदव्यास व त्यांचे अभिषिक्त श्रीमच्छंकराचार्य, यांचेच पूर्ण विचार सर्वांनीं विचारपूर्वक नीट मनन करून त्या प्रमाणें चालावें. निरर्थक अविचारानें जे फंद करतील, ते लोकांच्या ऐक्याची फूट करणारे ब्रह्मबंधु देशाचे शत्रु समजून आह्मी त्यांस या पुढें गय न करितां, सर्व संमतानें कडक शिक्षा करूं.

प्रत्येक धर्माध्यक्षानें आपल्या प्रांताचा हालहवाल, मुख्य मठाकडे वारंवार कळवीत जावा. तिकडूनही त्याबद्दल उत्तरें येत जावीं. मुख्य मठाच्या स्वामीनीं प्रति तीन किंवा दोन वर्षांनीं एकेका प्रांताची पाहणी करण्यास आपल्या लवाजम्यासुद्धां निघत जावें, व धर्मव्यवस्था कोठें कशी काय आहे ती पाहून तींत कमज्यास्त असल्यास धर्माध्यक्षास सूचना करीत जावी.

मुख्य मठाचे स्वामी ज्या ज्या वेळेस ज्या ज्या प्रांतीं येतील, त्या त्या वेळेस त्यानीं ज्या राजाच्या आश्रयानें हें धर्म संबंधीं महत्कार्य चालू होऊन निर्विघ्नपणें सर्वत्र स्थापन झालें त्याबद्दल मोठी सभा करून राजास वगैरे त्या संबंधें मानसूचक वस्त्रें वगैरे देऊन सर्वांसमक्ष त्याची तारीफ करून त्यांचें प्रोत्साहन करावें.

---

( सार्वजनिक भाग )

## प्रकरण २ रें.

### गोधनाची वृद्धि करणें.

गोधनाची वृद्धि करणें हें काम खरें ह्मटलें ह्मणजे मुख्यत्वें क-

रून राजाचें आहे. हल्लीं या देशांत म्लेच्छ जातीय परधर्मी राजा असल्या कारणानें, आजपर्यंत असंख्य गोधनाचा नाश झाला आहे व अजूनही स्वधर्मी राजे आणि लोक या विषयींची डोळेझांक करतील तर किती नाश होईल तें सांगवत नाहीं. कोट्यावधी गायींचा नाश झाल्यानें देशांत दूध, दहीं, लोणी, तूप, हीं इतकीं महाग झालीं आहेत कीं, तीं लोकांस विपुलपणें मिळेनाशीं झालीं आहेत व तेणेंकरून लोक अगदीं निःशक्त झाले आहेत. बरें, लोकांजवळ पैसा आहे ह्मणावें, तर प्रतिवर्षी देशांतील कोट्यावधी रुपये द्वीपांतरास जात असल्यानें लोकांत इतकें दारिद्र्य वाढलें आहे कीं, हजारो लोकांस वेळेस पोटभर भाकरीही मिळण्यास पंचाईत झाली आहे. ज्या कोणास ती थोडी बहुत मिळत आहे, त्यांस दूध इत्यादिकांच्या अभावामुळें निकृष्ट जे कांदा लसूण इत्यादि पदार्थ, त्यांचा उपयोग करणें भाग पडलें आहे. पूर्वी हिंदुराजांस यवन बादशहांकडून ज्या सनदा कार्यपरत्वें मिळत त्यांत गोवधनिषेधाचें एक कलम असे, इतका गोरक्षणाविषयीं पूर्वी विचार होता. खरोखर जर पाहिलें, तर ज्यानीं सरकारास अर्ज करून सती जाण्याचें बंद्र करविलें, त्यानीं तोच जर गोवध बंद करविला असतां, तर त्या पेक्षांही हें काम उत्कृष्ट केलें असें ह्मणतां आलें असतें. कारण सती ही दहावीस वर्षांनीं एकादी जाणारी असून गोवध नित्यशः लक्षावधी होणारा आहे. परंतु अल्पदृष्टीच्या मनुष्यास इतका दूरवरचा पोक्त विचार कोठून असणार?

पूर्वीचे राजे आपापल्यापदरीं पुष्कळ गोधन बाळगीत. दुर्योधन वगैरे राजे किती दुष्ट होते बरें! परंतु तसे असतांही त्यांच्या पदरीं लक्षावधीं गायी होत्या हें भारतावरून उघड दिसून येतें. याविषयीं वनपर्वांतील घोषयात्रा प्रकरण पहा. विराट राजा मांडलीक असतां, त्याच्या पदरीं साठ हजार गांयी होत्या, हें तर उत्तरदक्षिण गोग्रहणावरून सर्व विश्रुत आहेच. सारांश आपली प्रजा, शरीरानें व द्रव्यानें सुखी

असावी ह्मणून जशी पूर्वींच्या राजांची इच्छा असे तशी सांप्रतच्या परधर्मी राजाची नाहीं. यास्तव हिंदुस्थानांतील स्वधर्मी राजांनीं, ही गोष्ठ मनावर घेऊन आपापल्या राज्यांत गोधन वृद्धि करणें व इतर लोकांस तें वळण लावून देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. हें गोधन राजांनीं यशाच्या भागांतून घ्यावें. व प्रजा सुखी करावी. मागें दुसऱ्या भागाच्या चौथ्या प्रकरणांत धर्माचा, यशाचा व संग्रहाचा भाग, लोकांनीं कोठं ठेवावा, ह्मणजे त्याची योग्य व्यवस्था होईल, अगर सुरक्षित राहून आपणांस लाभही होऊन पाहिजे तेव्हां मिळूं शकेल व बुडण्याचें बिलकूल भय राहणार नाहीं अशी एक शंका राहिली तर त्याविषयीं असें समजावें कीं, धर्माच्या भागापैकीं पाव आणा तर धर्माध्यक्षाकडे द्यावयाचा हें मागें सांगितलेंच आहे. राहिला यशाचा भाग तो त्यानीं राजाकडे वाटेल तितका द्यावा, व संग्रहाचा भाग धर्माध्यक्षाकडे ठेवावा, अगर वाटेल तर दोनही भाग स्वधर्मी राजाकडे, किंवा धर्माध्यक्षाकडे द्यावे अथवा ठेवावेत.

सदरचा दोन प्रकारचा पैसा, राजाकडे किंवा धर्माध्यक्षाकडे जमा झाला असतां, त्यांनीं तो, त्याकरितां एक निराळी पेढी करून तींत जमा करून ठेवावा. त्यांत संग्रहाच्या भागाची व यशभागाची मालकास पावती तर द्यावीच; परंतु संग्रहभागाच्या चक्कींत तुम्हास शेंकडा दरसाल तीन रुपये किंवा चार रुपये व्याज मिळेल अशा ठरावाचा लेख असावा. शिवाय आणखीही त्यांत असें लिहिलेलें असावें कीं, हा पैसा तुह्मास जेव्हां गरज लागेल तेव्हां सगळा किंवा कांहीं अंश पाहिजे तेव्हां मिळेल.

ह्या ठेवींचें व्याज कोठून द्यावें? त्यास असें समजावें कीं, जे व्यवहारोपयोगी ग्रंथ करणारे गरीब ग्रंथकार वगैरे आहेत त्यांनीं जे ग्रंथ करून छापिले असतील, त्यांजवळून ते ग्रंथ त्यांच्या झालेल्या खर्चावर त्यांस कांहीं नफा देऊन विकत घ्यावे, आणि

त्याची सवाई वगैरे प्रकारानें विक्री करून जो नफा होईल, किंवा कोणी अडवलेला सावकार वगैरे, त्याचें वेंकेस पैशाचें काम केल्यानें, त्यांत जो नफा मिळेल किंवा गहाण वगैरे कोणेकाचें ठेविल्यानें त्यांत जो लाभ होईल, त्यांतून तें व्याज देत जावें.

येणेंप्रमाणें तीन प्रकरणांनीं सार्वजनिक प्रकरणाचा उपाय सांगितला. आतां हा होणें देशाच्या प्रारब्धोदयावर आहे. जर ह्या देशाचा ऊर्जित दशेस येण्याचा समय आला असेल, तर दूर दृष्टीच्या सूज्ञ राजांस अगर लोकांस हा प्रकार बरा वाटून त्यांच्या हातून यांत लिहिलेल्या व्यवस्थेप्रमाणें, सर्व गोष्टी त्यांनीं मनावर घेतल्या कीं, सहज सिद्धीस जाऊन सर्वत्र तेंच वळण लागेल व देशाचें कल्याण होईल. सारांश हा समष्ट्यात्मक प्रकार झाला तर ठीकच आहे, न झाला तर, मागें लिहिलेल्या प्रकारांप्रमाणें ज्याचें त्यानें, वागून यथाशास्त्र प्रपंच करावा व परमार्थास योग्य होऊन आपलें कल्याण करून घ्यावें.

समाप्त.

## पुरवणी पान ४९ ओळ चौथी.

श्रीमंत लोक म्हणजे राजे, जहागीरदार इत्यादिकांपासून तो रंकापर्यंत, क्रमें करून ज्यानीं त्यानीं आपापल्या योग्यतेप्रमाणें, राज्य-जहागीर इत्यादिकांपैकीं, जात उत्पन्नापैकीं, अगर पोटगी खर्चापैकीं, पांचवा भाग धर्माकडे काढून त्यांतून शेंकडा १८।४ प्रमाणें धर्माध्यक्षाकडे देत जावेत; ह्मणजे रुपया मागें ६$\frac{3}{5}$ पै प्रमाणें देत जावें.

बरोबर भाग तुटून ही गोष्ट समजुतींत यावी या साठीं, खालीं ३० रुपये वार्षिक प्राप्तीचा हिशेब दिला आहे तो बितपशीलः—धर्म भाग रुपये ६, यश अथवा कीर्तीचा भाग रुपये ६, संग्रह भाग रुपये ६, स्वतःचा भाग रुपये ६ आणि स्वजनाचा भाग रु० ६.

यांत धर्माचा भाग रुपये साहा, त्यांतून धर्माध्यक्षाकडे काय द्यावें त्याचा तपशीलः—

६. धर्माचा भाग साहा, त्यांत इष्ट व पूर्त अशीं प्रकरणें दोन.

४८८ इष्ट प्रकरण. यांत केवळ श्रोत्रिय, केवळ ब्रम्हनिष्ट, आणि श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ अशीं पोट प्रकरणें तीन.

१८८ केवळ श्रोत्रिय. याच्या पोटीं प्रकरणें ४

८६ कुलगुरु ( उपाध्यय ) यांकडे.

८६ श्रौत स्मार्ताग्नि सेवनाकडे.

८६ यज्ञयागादिकांकडे.

८६ वेदशास्त्रांच्या शाळांकडे.

१८८

१०८ केवळ ब्रह्मनिष्ठ याच्या पोटीं प्रकरणें २.

१०२ जगद्गुरू शंकराचार्यांकडे. देव-

०६ स्थानाच्या पूजा नैवेद्यादिकांकडे.

---

४०८

१०८ श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ ह्मणजे आपला अविद्या नाशक व निजानंद दायक सद्गुरु त्यांकडे.

---

१०८

१०८ पूर्त प्रकरण यांत पोट प्रकरणें चार..........

०६ देवालयांचे जीर्णोद्धाराकडे..........

०६ वापी तडागादिकांकडे. खालील व्यवस्थे प्रमाणें..........................

०६ रस्ते, पूल वगैरे बांधून त्यांवरून चालणारांपासून निराळा कर किंवा जकात न घेतां चालूं देण्यासाठीं.

०६ अन्नछत्र व सदावर्त्ताकडे..........

---

१०८

---

६

यावरून केवळ श्रोत्रिय भागांपैकीं वेदशास्त्रांच्या शाळांकरितां ०६ व केवळ ब्रह्मनिष्ट भाग संबंध १०८ मिळून इष्ट भागापैकीं आणि पूर्त्त भागापैकीं, अन्नसत्र व सदावर्त्ता बद्दल ०६ मिळून १०२४ एकंदर २०४. ३० रुपयां मागें धर्माध्यक्षाकडे द्यावयाचे म्हणजे शेंकडा ७०८ द्यावयाचे. परंतु आज आमचा आर्यदेश

अतिशय निर्धन झालेला असल्यामुळें शेंकडा ७॥८ देण्यास लोक समर्थ नाहींत, असें जाणून सर्वांस जो भाग सर्वकाळ सहज देतां यावा म्हणून चतुर्थांश म्हणजे १॥१४ शेंकडा ठरविला आहे. अर्थात रुपया मागें ३$\frac{3}{5}$ पै प्रमाणें सर्वांनीं धर्माध्यक्षाकडे देणें अवश्य आहे. बाकी राहिलेले धर्माचे भाग, ज्याचे त्यानें अवश्य ते ते त्या त्या कारणीं सशास्त्र लावावेत.

## पुरवणी पान ४९ ओळ १६.

एकंदर उत्पन्नापैकीं, निम्मे रकमेंत वेदशास्त्रांच्या शाळा, देवस्थानांचे खर्च, आणि अन्नछत्र व सदावर्त्त यांचा खर्च, मिळून तीन प्रकरणें समप्रमाणानें भागवून; राहिलेल्या निम्मे रकमेंत पांचवा भाग धर्माध्यक्षानें जगद्गुरु शंकराचार्यांकडे शृंगेरीस रवाना करावा, पांचवा भाग आपल्या वेतनाबद्दल घ्यावा, पांचवा भाग शिलक राखावा, आणि राहिलेल्या शिलकेंत सर्व प्रतिनिधी व त्यांचे हस्तक, आपला चिटणीस व त्याचा हस्तक, धनाध्यक्ष व त्याचा हस्तक, खजिना संरक्षण करणारे व इतर कामाचे शिपाई, तसाच सादिलवार खर्च इतकीं प्रकरणें तारतम्य पाहून भागवावींत.

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ | पंक्ति | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | १० | अक्षयानंद | अक्षय्यानद |
| १ | १९ | दिपं | दीपं |
| १ | २२ | हे | हें |
| ५ | ९ | सांप्रदाय | संप्रदाय |
| ७ | १० | पाजिजे | पाहिजे |
| ७ | १४ | नुरु | गुरु |
| ७ | १४ | ते | तें |
| ७ | १८ | दुसरे | दुसरें |
| ७ | २४ | येतें | येत्ये |
| ८ | १७ | इत्यांहि | इत्यादि |
| ८ | १८ | आश्रय | आश्रम |
| ८ | २५ | आश्रयाचा | आश्रमाचा |
| ८ | २९ | विधिनिषेव | विधिनिषेध |
| ११ | ३ | तसेंच | तसेच |
| १४ | १ | होताच | होतांच |
| १४ | २६ | समंजावेंत | समजावेत |
| १६ | ५ | फानगडी | भानगडी |
| १७ | १६ | तत्र | तंत्र |
| १७ | २३ | प्रकाशते | प्रकाशंते |
| १८ | १९ | तशीच | तशीच |
| १९ | ९ | चार्ये | चार्थे |
| १९ | ९ | वेदत | वदेत |
| २२ | १ | पशुधर्भे | पशुधर्मो |
| २२ | २ | राज्य | राज्यं |

| | | | |
|---|---|---|---|
| २२ | ४ | कामापे | कामोप |
| २२ | २३ | त्वयां | त्वया |
| २३ | ४ | होता | होतां |
| २३ | २८ | साम्रतच्या | सांम्रतच्या |
| २५ | १३ | गृही | गृहीं |
| २७ | ४ | पांडवा | पांडवां |
| २८ | २६ | याति | याती |
| २९ | ७ | त्यांचे | त्यांचें |
| ३२ | २१ | पाहण्यांस | पाहण्यास |
| ३२ | २५ | परिरन्यो | पतिरन्यो |
| ३३ | ९ | णेलें | गेलें |
| ,, | २० | करावणें | कराविणें |
| ३४ | ३ | सावकाशीनं | सावकाशीनें |
| ३५ | १४ | समजावीं | समजावींत |
| ,, | १७ | भागांचा | भागाचा |
| ३७ | १९ | असल्याचे | असल्याचें |
| ,, | २३ | ह | हे |
| ३९ | ९ | आपले | आपलें |
| ४० | १ | करणार | करणारा |
| ४४ | २ | प्रंकरणी | प्रकरणीं |
| ,, | ,, | त्यांचे | त्याचे |
| ,, | १० | धमर्थ्यिक्ष | धर्माध्यक्ष |
| ,, | १९ | कळवार्व | कळवावी |
| | २४ | घत | घेत |
| | १९ | आल | आलें |